# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### कल्याण-डोंबिवली महापालिकेत करोडो रुपयांचा टी.डी.आर.मध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१) ५१२ (२३-१२-२०१४). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेत करोडो रुपयांचा टी.डी.आर.घोटाळा झाल्याचे दिनांक २६ ऑगस्ट, २०१३ वा त्या दरम्यान निदर्शनास आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अनेक राखीव भूखंडावर बेकायदेशीर टी.डी.आर.मंजूर करुन महापालिका प्रशासनातील काही अधिकारी व नगरसेवकांनी देखील मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टी.डी.आर.घोटाळ्याबाबत काय कारवाई करण्यात आली,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :**(१) अशी बाब आढळून येत नाही.

(२) अशी बाब आढळून येत नाही. आरक्षित भूखंडाचे हस्तांतरणीय विकास हक्क महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील परिशिष्ट “डब्ल्यू” मधील तरतुदीनुसार प्रदान करण्यात येतात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### देहू तीर्थक्षेत्राच्या (जि.पुणे) विकासासाठी नियोजनबध्द विकास आराखडा राबविला जात असल्याबाबत

**(२) २१८३ (२३-१२-२०१४). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील तीर्थक्षेत्र देहूच्या विकासासाठी शासनाच्या वतीने राबविला जात असलेल्या विकास आराखडा हा स्थानिकांना विचारात न घेता तयार करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकास आराखड्यात देहूसाठी रु.१४४ कोटीचा निधी शासनाने दिला असून पहिल्या टप्प्यात सुरु असलेली कामे निर्धारित कालमर्यादेपेक्षा बरीच प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विकास आराखड्यातील सर्व कामाचे नियोजन हे विभागीय आयुक्त कार्यालयातून केले जात असल्याचे सांगण्यात येत असून कोणते काम सुरु आहे त्यासाठी कोणते साहित्य वापरले, संबधित कामासाठी किती निधीची तरतुद करण्यात आली, कामाचा निर्धारित वेळ किती तसेच त्याची सद्यःस्थिती काय आहे इत्यादी प्रश्नांची माहिती उपलब्ध करुन देण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, स्थानिक ग्रामस्थांना प्रतिनिधीत्व देऊन सर्वकष आणि नियोजन विकास आराखडा राबविण्यात यावा याबाबत शासन स्तरावर कोणता निर्णय झाला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७)** :- (१) हे खरे नाही. सर्व संबंधितास विचारात घेऊन विकास आराखडा मंजुर करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

एकुण रक्कम रु. २२८.७२ कोटीचा विकास आराखडा मंजुर करण्यात आला आहे. विकास आराखड्यातील मंजूर ३२ कामांपैकी १० कामे पुर्ण झाली आहेत, १४ कामे प्रगतीपथावर असून, २ कामे निविदा प्रक्रियेत आहेत.

(३) हे खरे नाही.

विभागीय आयुक्त, पुणे यांचे कार्यालयाकडून आवश्यक ती माहिती वेळोवेळी देण्यात येत आहे.

(४) सर्व संबंधिताना विचारात घेऊन विकास आराखडा मंजूर करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील अनेक शासकीय व पालिकेच्या मालकीचे मोक्याच्या ठिकाणचे भुखंड राजकिय नेत्यांनी, त्यांच्या काही संस्थांनी व खाजगी विकासकांनी बळकावले असल्याबाबत

**(३) १३२४३ (०७-०४-२०१५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनेक शासकीय व पालिकेच्या मालकीचे मोक्याच्या ठिकाणचे भुखंड राजकिय नेत्यांनी त्यांच्या काही संस्थांनी व खाजगी विकासकांनी बळकावले आहेत, काही भुखंडावर अतिक्रमण करुन तेथे हजारो झोपड्या उभ्या राहिलेल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई येथील किती एकर शासकीय व पालिकेच्या मालकीचे भुखंड आहेत, या शासकीय व मुंबई महानगरपालिकेच्या भुखंडावर अतिक्रमण करणाऱ्यांची शासनाने चौकशी करुन यादी प्रसिध्द करणार आहे काय,

(३) असल्यास, शासकीय व पालिकेचे बळकावलेले व अतिक्रमण केलेले भुखंड शासन परत घेणार काय व दोषींवर कोणती कार्यवाही करण्यात येणार आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेचे भूखंड राजकीय नेत्यांनी, त्यांच्या काही संस्थांनी किंवा खाजगी बिल्डरांनी बळकावल्याचे निदर्शनास आलेले नाही.

तथापि, महापालिकेच्या काही जागांवर अतिक्रमण झाले आहे.

(२) महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागामार्फत ४१७७ भूखंड मक्त्याने देण्यात आले असून, सदर भूखंडांचे अंदाजे क्षेत्रफळ ६३,३७,१८१,६० चौ.मी. एवढे आहे.

महानगरपालिकेच्या उद्यान विभागाच्या अखत्यारीत एकूण १०६८ भूखंड असून त्यांचे अंदाजे क्षेत्रफळ ५३,२६,४९२.२३ चौ.मी. इतके आहे.

(३) व (४) सन ०१.०१.२००० नंतरच्या भूखंडावरील अतिक्रमणाबाबत महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी कारवाई करण्यात येते.

---

**सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हद्दीतील श्री.मार्कंडेश्वर मंदिराची संरक्षक भित व बुरुज पुर्णपणे ढासळल्याबाबत**

**(४) १४०९४ (०७-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका हद्दीतील मिरज शहरातील ऐतिहासिक घाट व मंदिर संस्थान काळात मिरजचे पटवर्धन सरकार यांनी बांधला असून येथील श्री.मार्कंडेश्वर मंदिराची संरक्षक भित व बुरुज पुर्णपणे ढासळला असून सदरचे दुरुस्तीचे काम निधी अभावी बंद झाल्याचे माहे एप्रिल, २०१४ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त देवस्थानच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व त्यानुसार आतापर्यंत या दुरुस्तीच्या कामासाठी किती निधी उपलब्ध झाला आहे,
(३) असल्यास, या मंदिराच्या सरंक्षक व बुरुजाचे काम केव्हापर्यंत पुर्ण होणे अपेक्षित आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७)** :(१) हे अशंतः खरे आहे.
(२) व (३) शासन निर्णय दिनांक २४/०८/२००४ अन्वये सन २०१७-२०१८ करीता राज्य तीर्थक्षेत्र योजनेअंतर्गत जिल्हा प्रशासनाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यातील मिरज शहरामध्ये अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक असलेल्या हजरत पिर मिरासाहेब दर्गेबाबत**

**(५) १४११५ (०७-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मिरज शहरामध्ये अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक असलेल्या हजरत पिर मिरासाहेब दर्गाच्या दर्शनासाठी देश-विदेशातील भाविक येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सांगली जिल्ह्यातील मिरज शहरामध्ये अत्यंत प्राचीन व ऐतिहासिक असलेल्या हजरत पिर मिरासाहेब दर्गास सन २०११-१२ चे अर्थसंकल्प सादर करताना मा.अर्थमंत्री यांनी मिरजेतील मिरासाहेब दर्गाच्या सुशोभिकरणासाठी सर्वतोपरी निधी देण्याची घोषणा केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर शहरातील हजरत बाब ताजुद्दिन दर्गाच्या परिसराचा विकास आराखडा तयार केला व त्यास १३२.४९ कोटीच्या आराखड्यास प्रशासकीय मान्यता दिल्याप्रमाणे मिरजेतील मिरासाहेब दर्गाच्या सुशोभिकरणासाठी सर्वतोपरी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०७-२०१७) :** (१) व (२) होय.

(३) प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०१६-१७ अंतर्गत मिरजेतील मिरासाहेब दर्ग्याच्या सुशोभिकरणासाठी रु.१६८.५८ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या कामास पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग,मंत्रालय, मुंबई यांच्या दि.०४/०१/२०१७ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मंजूरी देण्यात आली. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०१६-१७ पर्यटन स्थळ विकासासाठी मुलभूत सुविधा या योजनेअंतर्गत मिरज येथील हजरत पीर दर्गा येथील नगरखाना परिसर मध्ये सी.सी.टी.व्ही कॅमेरे व एल.ई.डी. सोलार लाईट बसविणेच्या कामास रु.१८.९२ लक्ष इतक्या अंदाजपत्रकीय किंमतीच्या कामास प्रशासकीय मान्यता देवून निधी वितरीत केला आहे. त्यापैकी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व एल.ई.डी.सोलार लाईटची कामे पूर्ण झालेली असून उर्वरीत कामांची निविदा प्रक्रिया करुन घेणेची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मालेगांव (जि.नाशिक) शहरात पायाभूत व इतर सुविधा पुरविण्याबाबत**

**(६) १९५५३ (११-०८-२०१५). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरात पायाभूत व इतर सुविधा पुरविण्याकरिता महानगरपालिकेकडे पर्याप्त उत्पन्नाचे साधन नसल्याने मोठे प्रकल्प हाती घेतांना मनपा प्रशासनाला अडचणी निर्माण होत आहे, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास मा.मुख्यमंत्री व अर्थ मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील निवेदनात मालेगांव शहरातील विकास कामांसाठी अर्थसंकल्पिय तरतूद उपलब्ध करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने विकास कामांसाठी निधीची पूर्तता करण्याबाबत काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) व (२) होय.
(३) शासन प्राप्त विविध निवेदनांच्या अनुषंगाने मालेगाव महानगरपालिकेस निधी वितरीत करण्यात आला आहे. सन २०१५-१६ मध्ये पायभुत सुविधेकरीता रु.५ कोटी, हद्दवाढ योजनेत रु.५.८२ कोटी, विशेष अनुदान रु.५ कोटी तसेच सर्वसाधारण रस्ता अनुदान रु.०.७५ कोटी वितरीत केले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोवंडी, विभागातील संपूर्ण पांजरापोळ, सह्याद्री नगर, अशोक नगर, राहूल नगर, नागाबाबा नगर एमएमआरडीए वसाहत, भारतनगर परिसरातील पाणी पुरवठ्याच्या समस्येबाबत

**(७) १९६३७ (११-०८-२०१५). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोवंडी, विभागातील संपूर्ण पांजरापोळ, सह्याद्री नगर, अशोक नगर, राहूल नगर, नागाबाबा नगर एमएमआरडीए वसाहत, भारतनगर परिसरातील पाणी पुरवठ्याच्या समस्येबाबत या विषयावरील दिनांक ५ मे, २०१५ रोजीचे निवेदन अणुशक्तीनगर, मुंबई येथील लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत तसेच याप्रकरणी कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिलेले पत्र महानगरपालिकेस दिनांक २७.०७.२०१५ रोजी प्राप्त झाले आहे.
(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे :-

- अशोक नगर, राहुल नगर, नागाबाबा नगर येथील परिसरातील पाणी पुरवठ्यात पुरेशी सुधारणा करण्यात आली आहे.
- एमएमआरडीए वसाहतीकरिता एमएमआरडीएमार्फत टाकण्यात आलेली ६०० मि.मी. व्यासाची सदोष जलवाहिनी महानगरपालिकेमार्फत बदलण्यात येऊन अंदाजे ६०० मि.मी व्यासाची व ९०० मीटर लांबीची जलवाहिनी बसविण्यात येऊन पाणी पुरवठा सुरु करण्यत आली आहे.

- पांजरापोळ परिसरातील पाणी पुरवठ्यात सुधारणा करण्यात आली आहे.
- सह्याद्रीनगर - ब हा परिसर उंचावर असून तेथे पाणी पुरवठ्याचे जाळे उपलब्ध नसल्यामुळे सहाय्यक शोषक टाकी व उदंचन केंद्र उभारणे, जलवाहिन्यांची वितरण व्यवस्था करणे याकरिता तांत्रिक बाबी तपासण्याचे काम पूर्ण झाले असून सदर कामे २ आठवड्यात पूर्ण होऊन पाणी पुरवठा सुरु करण्यात येणार आहे.

---

**मुंबईतील ताडदेव, गावदेवी, खेतवाडी, नेपियन्सी रोड, मालाड, कुर्ला या परिसरातील नागरी सेवा-सुविधांबाबत**

**(८) २००३९ (११-०८-२०१५). ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील ताडदेव, गावदेवी, खेतवाडी, नेपियन्सी रोड, मालाड, कुर्ला या परिसरातील नागरी सेवा-सुविधा पुढील ६ वर्षात कोलमडणार असून महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, मल:निसारण, रस्ते आणि घनकचरा व्यवस्थापन या चारही नागरी सुविधा धोक्यात असल्याचे प्रजा फांऊडेशन या संस्थेने आपल्या अहवालात म्हटले आहे माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विभागातील नागरी सुविधांबाबत शासनाने दखल घेतली आहे काय,

(३) असल्यास, उक्त नागरी सुविधा सुधारण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) मुंबईतील ताडदेव, गावदेवी, खेतवाडी, नेपियन्सी रोड, मालाड, कुर्ला या परिसरातील नागरी सेवा-सुविधा पुढील ६ पर्यंत कोलमडणार असून महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा, मल:निसारण, रस्ते आणि घनकचरा व्यवस्थापन या चारही नागरी सुविधा धोक्यात असल्याबाबतचा प्रज्ञा फाउंडेशन या संस्थेचा अहवाल वस्तुस्थितीस धरुन नाही.

(२) व (३) सदर विभागात नागरी सुविधांची योग्य ती देखभाल व पुनर्बांधणी करण्याचे काम महानगरपालिकेमार्फत वेळोवेळी करण्यात येते.

तसेच सदर पसिरातील आवश्यक त्या नागरी सेवा सुधारण्याबाबत व अस्तित्वात असलेल्या सुविधांच्या देखभालीच्या प्रक्रियेबाबत महानगरपालिकेच्या संबंधित विभागाकडून दखल घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबई अग्निशामक दलामधील अधिकारी मुंबईमधील इमारतीस लागलेल्या आगीत कर्तव्यावर असताना वीर मरण आल्याबाबत

**(९) २५७४९ (१०-०८-२०१५). अॅड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई अग्निशामक दलामध्ये केंद्र अधिकारी पदावर कार्यरत असलेले श्री.महेंद्र मधुसुदन देसाई यांना दिनांक ९ मे, २०१५ रोजी गोकुळ निवासी, काळबादेवी, मुंबई इमारतीस लागलेल्या आगीत कर्तव्यावर असताना वीर मरण आल्याने त्यांची बायको, मुलांच्या उदरनिर्वाहाच्या प्रश्न निर्माण झाला व त्याच्या मालकीचे एक ही घर नसल्यामुळे कुटुंबियांना मुंबई महानगरपालिकेकडून अनुकंपा तत्वावर अग्रहक्क क्रमाने कायमस्वरुपी घर देण्याची मागणी विविध सामाजिक / कामगार संघटनांचे पदाधिकारी तसेच लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, राज्यमंत्री (नगरविकास), आयुक्त, मुंबई महानगरपालिका यांचेकडे लेखी स्वरुपात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा प्रस्तावित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे :-

- दिवंगत श्री.देसाई यांच्या पत्नीला अनुकंपा तत्वावर महानगरपालिकेमध्ये त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार लिपिक पदावर सामावून घेण्यात आले आहे.
- दिवंगत श्री.संजय राणे यांच्या मुलाला महानगरपालिकेमध्ये सामावून घेण्यात आले आहे.
- श्री.सुनील नेसरीकर व श्री.सुधीर अमिन यांच्या पाल्यांना अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याची बाब त्यांच्या विनंतीनुसार राखून ठेवण्यात आली आहे.
- श्री.महेंद्र देवाई, श्री.संजय राणे, श्री.सुनील नेसरीकर व श्री.सुधीन अमिन या अधिकाऱ्यांना शहीद दर्जा देण्यात आला असून त्यांना राष्ट्रपती अग्निशमन सेवा शौर्य पदक देऊन गौरविण्यात आले आहे.
- शहीद अधिकाऱ्यांच्या दोन पाल्यांचा पदवीपर्यंतचा शैक्षणिक खर्च देण्यासाठी मुंबई अग्निशमन दलाच्या सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून तरतूद करण्यात आली आहे.
- श्री.महेंद्र देसाई, श्री.नेसरीकर व श्री.अमीन यांच्या कुटुंबियांना शासनातर्फे निवासस्थान देण्याची पर्यायी व्यवस्था होईपर्यंत ते सध्या राहत असलेल्या मुंबई अग्निशमन दलाच्या सेवानिवासस्थानात राहण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच श्री.संजय राणे यांच्या कुटुंबियांनी त्यांना महानगरपालिकेमार्फत देण्यात आले सेवानिवासस्थान स्वेच्छेने रिक्त केले आहे.

- शहीर अधिकाऱ्यांच्या कुटुंबियांना अनुज्ञेय असलेल्या क्षेत्रफळाएवढे घर देण्याची कार्यवाही महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागामार्फत करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची हद्द डहाणूपर्यंत वाढविणेबाबत**

**(१०) २७३४२ (३१-०८-२०१५). श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर ते डहाणू हा विभाग उपनगरी रेल्वे विभाग म्हणून जाहीर झाला असून या मार्गावर उपनगरी रेल्वे वाहतुक सुरु झाल्याने या विभागात स्थलांतरणाचे प्रमाण प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ह्या विभागातील ग्रामपंचायतीचे उत्पन्न अत्यंत अपुरे असल्याने मुळ स्थानिक जनतेच्या मागण्यांची पूर्तता करणे अशक्य होत असताना ह्या वाढत्या स्थलांतरीतांचा वाढता बोजा ह्या ग्रामपंचायतीना सहन करणे आर्थिक दृष्टया परवडणारे नाही ह्याची शासनास जाणीव आहे काय,

(३) असल्यास, स्थानिक मच्छिमार व आदिवासी बांधवाना चांगल्या दर्जाच्या सुविधा उपलब्ध झाल्यास त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची हद्द डहाणूपर्यंत वाढवून देण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजीच्या निवेदनाद्वारे स्थानिक लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :**(१) व (२) सदर क्षेत्र हे मुंबई महानगर प्रदेशाच्या बाहेर स्थित आहे. मुंबई महानगर प्रदेशाची हद्द वाढवून पालघर व डहाणू या तालुक्यांचा समावेश करण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून प्राथमिक अभ्यास करण्यात आला आहे. सदर अभ्यासामध्ये ठाणे व पालघर जिल्ह्यातील तालुक्याची लोकसंख्या, प्रवासाचे वैशिष्ट्ये व भूवापर या घटकांचे तुलणात्मक विश्लेषण केले असता मुंबई महानगर प्रदेशातील तालुके आणि पालघर व डहाणू तालुके व लोकसंख्या वैशिष्ट्यानुसार पूर्णपर्ण वेगळे असल्याचे दिसून येते. सदर दोन्ही तालुके उपनगरीय रेल्वेने जोडले गेले असते तरी मुंबई महानगर प्रदेशाचा त्यांच्यावर प्रभाव दिसून येत नाही. पालघर व बोईसर येथील औद्योगिक क्षेत्र व रोजगाराच्या संधीमुळे त्या परिसराचा विकास होत असल्याचे दिसून येते. तसेच मुंबई महानगर प्रदेश आणि पालघर शहरांदरम्यानच्या क्षेत्रात खूपच कमी विकास दिसून येतो. तसेच पालघर व डहाणू तालुक्यांमध्ये मुंबई महानगर प्रदेशाचा प्रभाव नसल्याचे दिसून येते.

(३) दि. २४/१२/२०१४ रोजीचे स्थानिक लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त झाले असून निवेदनात नमूद बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील राज्य आणि केंद्र शासन शासनाच्या अखत्यारीत येणाऱ्या विविध प्राधिकरणांच्या रस्त्यांच्या देखभालीचे काम मुंबई महानगरपालिकेकडे सोपविण्याचा घेतलेला निर्णय**

**(११) ३५३४६ (२१-०१-२०१६). श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील राज्य आणि केंद्र शासन शासनाच्या अखत्यारीत येणाऱ्या विविध प्राधिकरणांच्या रस्त्यांच्या देखभालीचे काम मुंबई महानगरपालिकेकडेच सोपविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एमएमआरडीए आणि एमएमआरडीसी या प्राधिकरणांच्या विकास कामामुळे मुंबईतील रस्त्यांची झालेली दुरवस्था व खड्डेमये रस्ते यांची दुरुस्ती करण्यासाठी मुंबई महानगरपालिकेला येणाऱ्या खर्चाची पुर्तता होण्यासाठी सदर प्राधिकरणांकडून किती निधी उपलब्ध करुन दिला जाणार आहे वा याबाबत काय निर्णय घेण्यात आला आहे,
(३) असल्यास, शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने एमएमआरडीए, एमएमआरडीसी प्राधिकरणाने निधी उपलब्ध करुन दिला नसल्यास शासन मुंबई महानगरपालिकेला निधी उपलब्ध करुन देणार आहे काय त्याअनुषंगाने निर्णयात्मक कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७)** :(१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने रस्ते महानगरपालिकेकडे हस्तांतरीत केलेले नाहीत. तथापि राज्य शासनाच्या अखत्यारीत असलेले काही रस्ते महानगरपालिकेकडे देखभालीसाठी हस्तांरतीत करण्यात आलेले आहेत.

(२) पश्चिम उपनगरातील अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणामार्फत दि. ३१.०३.२०१५ रोजी "जसे आहे जेथे आहे तत्वावर" महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे.

सदर जोडरस्त्यावरील चरी भरण्याकरिता लागणारा रु. १३,८३,१०,०२९/- इतका निधी एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणामार्फत महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आला आहे. तसेच, सदर जोडरस्त्याच्या परिक्षणाकरिता लागणारा आवश्यक निधी महापालिकेस उपलब्ध करुन देण्याचे एम.एम.आर.डी.ए. प्राधिकरणामार्फत आश्वासित करण्यात आले आहे.

राज्य शासनाच्या प्राधिकरणामार्फत देविदास लेन पासून एस.व्ही.रोड पर्यंतचा लिंक रस्ता व संगीतकार सुधीर फडके पुलापासून पश्चिम द्रुतगती महामार्गापर्यंतचा एस.व्ही.रोड या रस्त्यांची कामे करुन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आले आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**टीडीआर, एफएसआय, भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनी आणि विकासक्षम जमिनींचा वापर यातून चालू आर्थिक वर्षात शासनाच्या तिजोरीत तब्बल १२ हजार कोटी रुपयांची भर पडणार असल्याबाबत**

**(१२) ३८००२ (२०-०१-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टीडीआर, एफएसआय, भाडेपट्टयाने दिलेल्या जमिनी आणि विकासक्षम जमिनींचा वापर यातून चालू आर्थिक वर्षात शासनाच्या तिजोरीत तब्बल १२ हजार कोटी रुपयांची भर पडणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल, नगरविकास, मुद्रांक शुल्क, गृहनिर्माण अशा वेगवेगळया खात्यांनी याकरिता नियमात करायच्या बदलामध्ये विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :**(१) हे अंशत: खरे आहे. सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात विविधविकास विषयक परवानगी देताना आकारावयाच्या अधिमुल्याद्वारे रुपये ५००० कोटी जमा करण्याचे उद्दिष्ट नगर विकास विभागास देण्यात आले होते. यास अनुसरुन शासनाने सदर आर्थिक वर्षामध्ये ना-विकास क्षेत्रामध्ये विविध विकास विषयक परवानगी देतांना / जागेचा वापर बदल करतांना / विविध वापराकरिता अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करतांना स्थानिक स्तरावर परवानगी देण्याचा व अधिमूल्य आकारण्याचा निर्णय घेतला. याशिवाय बृहन्मुंबई महानगरपालिकेसाठी जमीन मालकाने खाजगी जागेवर सार्वजनिक वाहनतळ प्रकल्पाचे बांधकाम करुन हस्तांतरण केल्यास त्या अधिमूल्याचा भरणा करुन प्रोत्साहनात्मक चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करणे, अशा प्रकारच्या महसूल जमा होण्याच्या दृष्टीने चालू वार्षिक बाजारमुल्य दर तक्त्यातील जमिनीच्या मुल्यावर आधारीत अधिमूल्य (Premium) आकारणी करणे, अधिमूल्याच्या विद्यमान दरात वाढ करुन परवानगी देण्यासंबंधी सूचना / अधिसूचना निर्गमित केल्या. त्यानुसार स्थानिक पातळीवर अधिमूल्य आकारुन परवानगी देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. यातून शासनाच्या महसूलात भरघोस स्वरुपाची वाढ होणार आहे.

(२) ही बाब खरी नाही. अ.क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

(३) व (४) शासनातर्फे मुद्दा क्र. १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सन २०१५-१६ या वर्षापासून विविध प्रकरणी अधिमूल्य आकारण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित केले असून त्यानुसार स्थानिक पातळीवर अधिमूल्य आकारुन परवानगी देण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

---

**उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी युवराज भदाणे यांच्याकडे उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती असल्याने त्यांची चोकशी करणेबाबत**

**(१३) ३९०८९ (२३-०१-२०१६). श्रीमती ज्योती कलानी (उल्हासनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर महानगरपालिकेचे अधिकारी युवराज भदाणे यांच्याविरुध्द उत्पन्नापेक्षा जास्त संपत्ती असल्याने त्यांची विभागीय चोकशी सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या चौकशीमध्ये अनधिकृत बांधकामांना संरक्षण देणे तसेच महिलांशी गैरवर्तन करणे असे गंभीर आरोप असतानाही महानगरपालिकेने व पोलीस विभागाने कोणतीही कारवाई केली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महानगरपालिकेच्या महासभा ठराव क-५१- दिनांक १५ जानेवारी २०१३ अन्वये श्री. भदाणे यांना जनसंपर्क अधिकारी व्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त कार्यभार देऊ नये अशा आदेशाचे उल्लंघन करून त्यांना अतिरिक कार्यभार दिला असल्याने लोकप्रतिनिधींचा अवमान झाला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री. भदाणे यांच्यावर महानगरपालिकेच्या वतीने कोणती कारवाई करण्यात येत नसल्याने सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :**(१) हे खरे नाही. तथापि सदर प्रकरणी श्री.युवराज भदाणे यांचेविरुध्द मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक १४५/२०१३ व ४५४/२०१५ दाखल करण्यात आल्या असून सदर प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत.

(२) सदर प्रकरणी महानगरपालिकेमार्फत व पोलीस विभागामार्फत कारवाई करण्यात आली आहे.

(३) उल्हासनगर महानगरपालिकेचा ठराव क्रमांक ५१ हा अशासकीय ठराव असून श्री.भदाणे यांच्यासह इतर ४ अधिकारी यांना इतर अतिरिक्त कार्यभार देऊ नये असा ठराव होता.

तथापि, सदर ठरावाच्या विरोधात श्री.भदाणे यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक ३६८१/२०१५ दाखल केली आहे.

महानगरपालिका अधिकारी / कर्मचारी सेवा व भर्ती नियमान्वये एकीकृत संवर्गातील पदे आंतरपरिवर्तनीय असल्याने व श्री.भदाणे यांचे पद एकीकृत संवर्गातील असल्याने तसेच महानगरपालिकडे अधिकारी संख्या कमी असल्याने त्यांना समकक्ष पदाचा अधिभार देण्यात आला आहे.

(४) व (५) श्री.युवराज भदाणे अनधिकृत बांधकामाबाबत झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने त्यांची २ वेळा विभागीय चौकशी करण्यात येऊन सदर प्रकरणी त्यांना दोषमुक्त करण्यात आले आहे.

सन २००४ मध्ये उल्हासनगर महानगरपालिकेतील काही महिल कर्मचाऱ्यांनी श्री.भदाणे यांच्याविरोध गैरवर्तनाचे आरोप केले होते. सदर प्रकरणी राज्य महिला तक्रार निवारण समितीने श्री.भदाणे यांना दोषमुक्त केले आहे.

महिलांशी गैरवर्तन करणे यासंदर्भात श्री.भदाणे यांचेविरोधात उल्हासनगर येथील मध्यवर्ती पोलीस स्टेशन येथे गु.र.क्रमांक ६३/२०१४, भादंवि ३५४, ३२३ व गु.र. क्रमांक ६८०/२०१५ भादंवि ३५४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून गु.र.क्रमांक ६३/२०१४ मध्ये दिनांक ९०.१२.२०१४ रोजी मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर प्रकरणी न्यायप्रविष्ठ आहे. तसेच, गु.र.क्रमांक ६८०/२०१५ मध्ये श्री.भदाणे यांना सीआरपीसी ४१ (अ) प्रमाणे नोटीस देण्यात आली असून, सदर गुन्ह्यांचा तपास सुरु आहे.

---

## महानगरपालिका आरोग्य सेवा अंतर्गतच्या रुग्णालयात नॅशनल प्लाझ्मा सेन्टर्स कार्यान्वित करण्याबाबत

**(१४) ३९८३५ (१३-०५-२०१६). श्री.अबू आजमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महानगरपालिका आरोग्य सेवा अंतर्गतच्या रुग्णालयात वा विवाक्षितपणे महानगरपालिका सामान्य रुग्णालयात, स्वाथ्य उपकेंद्रात तसेच महानगरपालिका आरोग्य सेवा अधिनस्त रुग्णालयात नॅशनल प्लाझ्मा सेन्टर्स तातडीने कार्यान्वित करण्याबाबतची बाब तसेच खास करून उत्तर-पूर्व मुंबई महानगरातील सदर प्लाझ्मा सेन्टर्स व ह्युमन एम्बूलंसचे न परवडणारे दरपत्रक विचारात घेता आरोग्य सोयी-सुविधा प्रत्यार्पित करण्याबाबतची मागणी स्थानिक जनतेने, लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य, कुटुंब व वैद्यकीय शिक्षण), मा. राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण व वैद्यकीय शिक्षण), महासंचालक (सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण व वैद्यकीय शिक्षण) तसेच त्यांच्या असलेल्या संबंधित रुग्णालयाच्या प्रमुखांकडे महानगरपालिका प्रादेशिक आरोग्य तथा वैद्यकीय शिक्षण अधिकारी यांच्या निदर्शनास सदरची बाब माहे जानेवारी, २०१६ वा त्या सुमारास तसेच वैद्यकीय क्षेत्रातील प्रमुखांनी संबंधित इस्पितळांच्या अधिष्ठाता यांच्या निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रश्नोक्त बाब (१) च्या अनुषंगाने राज्यातील वैद्यकीय संस्थांचे प्रमुख, जनप्रतिनिधी यांनी सदरची बाब शासनाच्या आरोग्य तथा वैद्यकीय शिक्षण विभागाकडे लेखी स्वरुपात वा वेळोवेळी झालेल्या सार्वजनिक आरोग्य तथा वैद्यकीय मेळाव्यात नोंदविली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणता धडककृती कार्यक्रम आखण्याची कार्यवाही केली वा धडक कृती कार्यक्रम गठीत केला आहे तसेच त्यानुसार कार्यवाहीची अंमलबजावणी करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) राष्ट्रीय रक्तद्राव विघटन केंद्राचा मूळ प्रकल्प हा के.ई.एम. रुग्णालयातील ७ व्या मजल्यावर कार्यान्वित होता.

परंतु, अन्न व औषध प्रशासन यांच्या कायद्यातील चांगल्या उत्पादन पध्दती (GMP) प्रकल्पासाठी आवश्यक असलेली जागा व अद्ययावत यंत्रसामग्री यांची पुर्तता होत नसल्याने, संपूर्ण प्रकल्प शताब्दी रुग्णालय, गोवंडी येथे स्थलांतरीत करण्याचे ठरले.

शताब्दी रुग्णालय, गोवंडी येथील सदर प्रकल्पाचे काम करण्याकरिता टर्न की निविदा मागविण्यात आल्या होत्या. तथापि, दिलेल्या वेळेत कंत्राटदाराने काम पूर्ण न केल्याने नव्याने निविदा मागविण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**मुंबईमध्ये असलेल्या अनेक धोकादायक इमारती पाडण्यापूर्वी इमारतीमधील रहिवाश्यांना चटई क्षेत्राचे प्रमाणपत्र देण्याबाबत**

**(१५) ४२८३५ (०५-०५-२०१६). श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईमध्ये असलेल्या अनेक धोकादायक इमारती पाडण्याची कार्यवाही पूर्ण करण्यापूर्वी इमारतीमधील रहिवाश्यांना त्यांच्या सद्य:स्थितीत असलेल्या चटई क्षेत्राचे प्रमाणपत्र देण्याबाबत मुंबई महानगरपालिकेने तयार केलेल्या नव्या कार्यपध्दतीची अंमलबजावणी राज्यातील अन्य महानगरपालिका आणि नगरपालिका क्षेत्रात लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नवीन कार्यपध्दतीच्या अंमलबजावणीची सद्य:स्थिती काय आहे व किती महानगरपालिका व नगरपालिकांनी ही कार्यप्रणाली स्विकारली आहे.
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७)** :(१) व (२) शासन परिपत्रक नगर विकास विभाग दिनांक ०५.११.२०१५ अन्वये जुन्या/ मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. मुंबई महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील तरतुदीनुसार नागरी स्थानिक संस्थांकडून कार्यवाही करण्यात येते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भादवड (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणामध्ये विद्युतीकरण व सुशोभिकरण करण्याकरिता विशेष अनुदान मंजूर करण्याबाबतची केलेली मागणी**

**(१६) ४८०३४ (०६-०५-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **क्रीडा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भादवड (ता.भिवंडी,जि.ठाणे) येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण येथे विद्युतीकरण व सुशोभिकरण करण्याकरिता ३ कोटी रुपयांचे विशेष अनुदान मंजूर करण्याबाबतची मागणी तेथील स्थानिक लोकप्रतिनिधी, भिवंडी पूर्व यांनी मा. क्रीडा व युवक कल्याण मंत्री, प्रधान सचिव, नगरविकास यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्रीडांगणाची दुरवस्था झाली असून भिवंडी परिसरात जिल्हास्तरीय, तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा आयोजित करण्यासाठी क्रीडांगण असूनही विद्युतीकरण भाडयाने करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही प्रकरणाबाबतची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार भिवंडी येथील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण येथे विद्युतीकरण व सुशोभिकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१३-०७-२०१७)** : (१) होय हे खरे आहे.

(२) व (३) सन २०१५-१६ करीता भिवंडी निजामपूर महानगरपालिकेस शासन निर्णय दिनांक ८ मार्च, २०१६ अन्वये रक्कम रु.१० कोटी पायाभुत सुविधा करीता मंजुर करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील विठ्ठलवाडी ते वारजे या नदीपात्रालगतच्या पुररेषेमध्ये येणाऱ्या १६ सोसायट्यांना महानगरपालिकेने नोटीसा दिल्याबाबत**

**(१७) ४८२२९ (०६-०५-२०१६). श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील विठ्ठलवाडी ते वारजे या नदीपात्रालगतच्या पुररेषेमध्ये येणाऱ्या १६ सोसायट्यांना महानगरपालिकेने नोटीसा बजावल्यामुळे रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असल्याची बाब माहे जानेवारी २०१६ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात पाटबंधारे विभागाने पूररेषा निश्चित केलेली नसताना, या रहिवाशांना नोटीस देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :**(१) मे. हरित लवाद यांनी दि.१४/०१/२०१५ रोजी दिलेल्या आदेशानुसार इमारतीच्या मंजुरीची कागदपत्रे सादर करणेबाबत पुणे महानगरपालिकेने १२ सोसायट्यांना पत्र दिले आहे.

(२) प्रस्तुत प्रकरणी मे.हरित लवाद यांचेकडे सादर केलेल्या पुररेषा दर्शविलेल्या नकाशानुसार पुणे महानगरनपालिकेने संबंधित सोसायट्यांना पत्र दिलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे शहरातील कोथरूड भागात नियोजित शिवसृष्टीचे काम प्रलंबित असल्याबाबत**

**(१८) ५०४२९ (१६-०५-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरातील कोथरूड भागात नियोजित शिवसृष्टीचे काम अनेक वर्षांपासून प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबरच्या २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिवसृष्टीचे उभारणीच्या जागी प्रस्तावित मेट्रो स्थानक नियोजित असल्याचेही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियोजित शिवसृष्टी तसेच मेट्रो स्थानकासाठी किती जमीन निश्चित करण्यात आलेली आहे,

(४) असल्यास, शासनाने याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :**(१) ते (५) पुणे महानगरपालिकेच्या मुळ हद्दीमधील मौजे कोथरुड स.नं. ९२+९३ या जागेचे क्षेत्र २८ एकर ५ गुंठे असून या जागेवर शिवसृष्टी फेज-१ विकसीत करण्याचे पुणे महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे. सदर जागेवर पुणे महानगरपालिकेकडून प्रारुप विकास योजनेमध्ये CC-६ आरक्षण प्रस्तावित करण्यात आले होते. तसेच याच जागेवर मेट्रो प्रकल्पातील मार्गीका क्र. २ (वनाज ते रामवाडी) या मार्गातील डेपोसाठी जागा मेट्रो प्रकल्प अहवालात निश्चित केले असून सदर प्रकल्प अहवालास पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेने दि. २७/०१/२०१० रोजी मान्यता दिलेली आहे. तथापि प्रारुप विकास योजनेस शासनाने दि. ०५/०१/२०१७ रोजी मंजूर देतांना ई.पी. १३ अन्वये CC-६ आरक्षण वगळून त्याखालील जागा सार्वजनिक / निय-सार्वजनिक विभागात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले असल्याने सार्वजनिक / निम-सार्वजनिक विभागामध्ये शिवसृष्टीचा विकास अनुज्ञेय होऊ शकेल.

तसेच पुणे महानगरपालिकेच्या वाढीव हद्दीमध्ये स.नं. ९९+१०० येथील बीडीपी आरक्षीत मिळकतीपैकी ७५ एकर क्षेत्र शिवसृष्टी फेज-२ म्हणून महानगरपालिकेस विकसीत करावयाचे आहे. बीडीपी आरक्षणात महानगरपालिकेच्या / शासनाच्या मालकीच्या जागेत ऐतिहासिक संग्रहालयासाठी ४% मर्यादीत बांधकाम अनुज्ञेय केलेले असल्याने तेथे शिवसृष्टी वापर अनुज्ञेय होऊ शकेल.

---

### राज्यात गोरगरीब जनतेने लाखो रुपये गुंतवून घेतलेली घरे अनधिकृत असल्याने नोटीसा देऊन तोडण्यात येत असल्याबाबत

**(१९) ५०९२५ (१६-०५-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोरगरीब जनतेने लाखो रुपये गुंतवून घेतलेली घरे अनधिकृत असल्याचे निदर्शनास आल्यावर या इमारती तोडण्याच्या नोटीसा देण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबईतील अनधिकृत इमारतींना अधिकृत करण्याची बाब शासन विचारधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुंबई, पुणे व अन्य इतर ठिकाणाच्या अनधिकृत इमारतींबाबत शासनाची भूमिका काय आहे,

(४) असल्यास, यापुढे अनधिकृत इमारती बांधल्याच जाऊ नये यासाठी कोणती दक्षता घेण्यात येत आहे,

(५) तसेच यापूर्वीच्या अनधिकृत इमारतीतील नागरिक बेघर होऊ नये यासाठी कोणते धोरण शासनाने आखले आहे, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७)** :(१) नियोजन प्राधिकरणाची परवानगी न घेता करण्यात आलेल्या बांधकामाबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५२ व ५३ अन्वये नोटीस बजावण्यात येते.

(२), (३) व (४) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमात सुधारणा करुन महाराष्ट्र अधिनियम क्र. ३२/२०१७ पारती करण्यात आलेला असून यामधील तरतूदीनुसार दि. ३१/१२/२०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे कंपाऊंडींग चार्जेस, सेवा सुविधा शुल्क तसेच प्रिमियम आकारणी करुन कंपाऊंडेड स्ट्रक्चर म्हणून घोषित करणेबाबतची तरतुद करण्यात आलेली आहे. या दिनांकानंतरही अनधिकृत बांधकामे नियमित होऊ शकणार नसल्याने अशा स्वरुपाच्या बांधकामावर उक्त अधिनियमातील तरतूदीनुसार नियोजन प्राधिकारणांनी कारवाई करणे बंधनकारक आहे.

(५) उपरोक्त नमूद अधिनियमातील सुधारणांच्या अनुषंगाने कलम १५८ अन्वये याबाबतचे नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. सदरचे नियम तयार झाल्यानंतर त्यामधील तरतूदीनुसार दि. ३१/१२/२०१५ पुर्वीची बांधकामे कंपाऊंड स्ट्रक्चर म्हणून नियमित होऊ शकतील.

---

### राज्याच्या विकास नियंत्रण नियमावलीत झालेली बांधकामे नियमित करण्याबाबत

**(२०) ५३३१४ (१७-०५-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या विकास नियंत्रण नियमावलीत किती तारखेपर्यंत झालेली बांधकामे नियमित करण्यात येतील याबाबत स्पष्टता नसल्याने यापुढे होणारी बेकायदा बांधकामे सुद्धा नियमित होऊ शकतात ही बाब मार्च, २०१६ वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बेकायदा बांधकामे होऊ नयेत याबाबत शासनाचे स्पष्ट धोरण नाही, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने विकास नियंत्रण नियमावलीत बदल करण्यासाठी काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७)** :(१) व (२) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियमात सुधारणा करुन महाराष्ट्र अधिनियम क्र.३२/२०१७ पारीत करण्यात आलेला असून यामधील तरतूदीनुसार दि. ३१/१२/२०१५ पुर्वीची अनधिकृत बांधकामे कंपाऊंडींग चार्जेस, सेवा सुविधा शुल्क तसेच प्रिमियम आकारणी करुन कंपाऊंडेड स्ट्रक्चर म्हणून घोशित करणेबाबतची तरतुद करण्यात आलेली आहे. त्यामुळे या दिनांकानंतरही अनधिकृत बांधकामे नियमित होऊ शकणार नाहीत.

(३) उपरोक्त नमूद नुसार अधिनियमात आवश्यक सुधारणा करण्यात आलेली असून उक्त अधिनियमातील कल १५८ अन्वये याबाबतचे नियम तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे. त्यामुळे विकास नियंत्रण नियमावलीत बदल करणेची आवश्यकता नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कल्याण(जि. ठाणे) येथील अनेक विकास कामे एमएमआरडीएमार्फत करण्यात येणार असल्याबाब**

**(२१) ५४४६९ (२९-०८-२०१६). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्र आणि ३७ गावात कल्याण रिंगरोड, मोठागाव माणकोली पूल, दुर्गाडी पूल, बीकेसीच्या धर्तीवर ग्रोथ सेंटर आदी अनेक विकास कामे एमएमआरडीएमार्फत करण्याचा निर्णय झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कामे किती कालावधीत पुर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे व त्यानुषंगाने कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे,
(३) अद्याप नियोजनाच्या अनुषंगाने विकासकामे सुरु झाली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :** (१) होय.
(२) (अ) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका (जि.ठाणे) क्षेत्रातील कल्याण रिंग रोडसाठी भूमिअधिग्रहणाची प्रक्रिया सुरु असून कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमार्फत देण्यात आलेल्या जमिनीच्या उपलब्धतेनुसार सदर रस्त्याचे कामे ७ भागामध्ये विभागून निविदा मागविण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत ३६ महिने कालावधीमध्ये पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(ब) मोठागाव-माणकोली पुलाच्या बांधकामास दि. १४ मार्च, २०१६ रोजी कार्यदेश देण्यात आला आहे. सदर काम पूर्ण करण्याचा कालावधी पावसाळ्यासह ३६ महिने असून हे काम प्रगतीपथावर आहे.
(क) दुर्गाडी पुलाच्या बांधकामास दि. १० मार्च, २०१६ रोजी कार्यादेश देण्यात आला आहे व हे काम प्रगतीपथावर असून २४ महिने कालावधीमध्ये पूर्ण करण्याचे नियोजित आहे.
(ड) बीकेसीच्या धर्तीवर ग्रोथ सेंटरसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे भोपर (भाग) संदप, उसरघर (भाग), घारिवाली (भाग), मानगांव (भाग), हेदुटणे (भाग), कोळे, काटई (भाग), निळजे (भाग) व घेसर (भाग) या १० गावांमधील अंदाजे १०८९ हे आर. क्षेत्राच्या प्रस्तावित कल्याण ग्रोथ सेंटर विकसित करण्याच्या प्रस्तावास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने तत्वत: मान्यता दिलेली आहे व त्यानंतर शासनाने दि. ३०/०४/२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार

या १० गावांमधील सुमारे १०८९ हे ग्रोथ सेंटरच्या क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नेमणूक कायम ठेऊन उर्वरित क्षेत्रासाठीची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची नेमणूक रद्द केली आहे. प्रस्तावित कल्याण ग्रोथ सेंटरसाठी सल्लागाराची नेमणूक करण्यासाठीची निविदा मागविली असून सल्लागाराची नेमणूक झाल्यावर नियोजनाच्या दृष्टीने लागणाऱ्या संपूर्ण क्षेत्राचे सर्वेक्षणे, प्रकल्प अहवाल इ. वर अंदाजे एक वर्षात कार्यवाही करुन नगररचना परियोजना तयार करण्याचे नियोजित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे महापालिका क्षेत्रातील सर्व कार्यालये एकाच इमारतीत सुरु करण्याबाबत**

**(२२) ५६०८४ (२६-०८-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महापालिका क्षेत्रातील मुंब्रा येथील ३७/१ अन्वये अंतिम करण्यात येणाऱ्या भूखंडावरील इमारतीत मुंब्रा प्रभाग समिती कार्यालय, सांस्कृतिक भवन व परिसरातील शासनाची सर्व कार्यालये सुरु करण्यासाठी सर्व संबंधितांची बैठक घेऊन निर्णय घेण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७ मे, २०१६ रोजी मा.नगरविकास राज्यमंत्री यांचेकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा काण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०१७) :**(१) होय.
(२) आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांनी मौ.मुंब्रा येथील जुना स.नं. १०२/अ, नवीन स.नं.१०२/१/अ आणि स.नं.१३४ (भाग) या जमिनीपैकी सुमारे १७५५९ चौ.मी. क्षेत्राची जमिन प्रभाग समिती कार्यालय व कल्चरल सेंटर या प्रमाणे आरक्षित करण्याचा व या आरक्षणाकरिता १२.०० मी. रुंदीचा रस्ता दर्शविण्याचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ च्या प्रस्ताव शासनास दि. १४/११/२०१४ च्या पत्रान्वये सादर केला होता. सदरचा प्रस्ताव शासनाने काही अटींसापेक्ष कलम ३७(२) अन्व्ये दि. १५/१२/२०१६ च्या अधिसूचनेन्वये मंजूर केला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मेट्रो रेल्वेच्या शिवाजीनगर ते न्यायालयीन इमारत परिसरापर्यंतच्या वाढीव मार्गाबाबत**

**(२३) ६२८६२ (२९-०८-२०१६). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिवाजीनगर, पुणे ते हिंजवडी, पुणे दरम्यान टाकण्यात येणाऱ्या मेट्रो रेल्वेच्या मार्गास शिवाजीनगर ते न्यायालयीन इमारत परिसरापर्यंत वाढविण्यास पुणे महानगर प्रदेश क्षेत्र विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) मंजुरी दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे शहरातील मेट्रो रेल्वेच्या विस्ताराचे स्वरूप कसे असणार आहे व त्याचा सर्वसाधारण तपशील काय असणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) शिवाजीनगर ते हिंजवाडी येथील या मेट्रोची लांबी १७.०० कि.मी. इतकी होती. दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन, दिल्ली यांनी सुचविल्याप्रमाणे शिवाजीनगर ते हिंजवडी हा मेट्रो प्रकल्प पुणे शहरातील प्रस्तावित दोन मेट्रो मार्गांना जोडण्यासाठी व हिंजवडी येथील मेगा पोलिस सर्कल पर्यंत सुमारे २३.३ कि.मी. इतक्या एकूण लांबीसाठी वाढवून प्रकल्पाची सुसाध्यता तपासून सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे संबंधी दिनांक १३/०५/२०१६ रोजीच्या प्राधिकरण सभेने ठराव क्र. ७२ अन्वये निर्देश दिले होते. त्यानुसार दिनांक ०४/११/२०१६ रोजी या प्रकल्पाचे नियुक्त सल्लागार दिल्ली मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. यांनी सादर केला आहे. सदर सविस्तर प्रकल्प अहवालास प्राधिकरणाने दिनांक २८/१२/२०१६ रोजीच्या सभेत स्विकृती दिली. सध्या हिंजवडी ते शिवाजीनगर या मेट्रो प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी उद्योजकांच्या पूर्व पात्रतेसाठी (RFQ) निविदा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर मागविल्या असून निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक २२/०६/२०१७ पर्यंत आहे.

---

**पुणे येथील प्रस्तावीत रींग रोडला विरोध होत असल्याबाबत**

**(२४) ६७२२८ (१६-०१-२०१७). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य विकास महामंडळाच्या प्रस्तावीत रींग रोडला अनेक ठिकाणी विरोध करण्यात आल्याचे दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिंग रोडला होणाऱ्या विरोधावरील हरकती व सूचनांची सुनावणी दिनांक ३ ऑक्टोबर, २०१६ रोजी पूर्ण करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रादेशिक योजनेतील प्रस्तावित रिंग रोड व एम.एस.आर.डी.सी. ने आखणी केलेला अर्धवर्तुळाकार रिंग रोड यापैकी योग्य तो रिंग रोड निश्चित करुन ग्रामस्थांच्या हरकती, सूचना सोडविण्याबाबत शासनाने अद्यापी कुठलाही निर्णय घेतला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन याबाबत कोणती कार्यवाही करणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१७)** : (१) पुणे जिल्ह्याच्या मंजूर प्रादेशिक योजनेत पुणे महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाने सादर केलेल्या प्रस्तावानुसार वळण रस्त्याची रुंदी ११० मी. पर्यंत वाढविणे तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार ११० मी. रुंद रस्त्याची आखणी समाविष्ठ करण्यासाठी शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम-२०(३) अन्वये दि.१४/०६/२०१६ रोजी सूचना प्रसिध्द करुन याबाबत प्राप्त होणाऱ्या सूचना हरकतींच्या अनुषंगाने शासनास अहवाल सादर करणेसाठी सह संचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे यांची नियुक्ती केलेली होती. सदर प्रसिध्दीकरणानंतर नियुक्त अधिकारी यांचेकडे याबाबत एकुण २३४७ सूचना / हरकती प्राप्त झालेल्या होत्या.

(२) उपरोक्त नमूद सूचना / हरकतदारांना दि.२९/०८/२०१६ ते दि.२२/०९/२०१६ या कालावधीत सुनावणी देऊन नियुक्त अधिकारी यांनी त्यांचा अहवाल दि.१७/१०/२०१६ रोजी शासनास सादर केलेला आहे.

(३) पुणे महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाचा रिंग रोड तसेच महाराष्ट्र रस्ते रोड विकास महामंडळाचा ११० मी. रुंदीचा रस्ता याप्रमाणे दोन रस्ते प्रस्तावित असल्याने व काही भागात दोन्ही रस्त्याची आखणी जवळून जात असल्याने शासनाने या फेरबदलाबाबत दि.१७/०३/२०१७ रोजी केवळ पुणे महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाचा रिंग रोड मान्य करणेबाबतची उक्त अधिनियमाच्या कलम-२०(४) अन्वयेची अधिसूचना निर्गमित केलेली असून त्यामध्ये महाराष्ट्र रस्ते रोड विकास महामंडळाचा प्रस्ताव प्रलंबित ठेवल्याचे नमूद केलेले आहे. यानंतर या दोन्ही रस्त्याच्या आखणीतील पुनरावृत्ती टाळण्यासाठी तसेच सामाईक आखणी किमान ठेऊन रस्त्याच्या सुयोग्य आखणीची शासनास शिफारस करणेकामी दि.०५/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रधान सचिव (नवि-१) यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केलेली असून सदर समितीने सादर केलेल्या अहवालानुसार दोन्ही रस्त्याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी उर्से ते सोलू या सुमारे ३८ कि.मी. लांबीतील महाराष्ट्र रस्ते रोड विकास महामंडळाची आखणी वगळण्यात आली आहे. तसेच सोरताप वाडी ते खेड शिवापूर ही आखणी पुर्न:रचित करुन पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी देखील उपयुक्त ठरेल याप्रमाणे अभ्यास करुन उचित प्रस्ताव सादर करणेबाबत महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळास शासनाने सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील एमएमआरडीएच्या अखत्यारितील १२,५०० चौ.मीटरच्या भूखंडाबाबत**

**(२५) ७००३७ (१६-१२-२०१६). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील एमएमआरडीएच्या अखत्यारितील १२,५०० चौ.मीटरचा व्यावसायिक वापराचा भूखंड एमएमआरडीएने विक्रीस काढला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड हा मुंबई शहर व मुंबई उपनगरातील कोणत्या विभागातील आहे व विक्रीतून एमएमआरडीएला किती हजार कोटी रुपये मिळणार आहेत,
(३) असल्यास, सदर भूखंड कोणत्या व्यावसायिक धारकांनी वा कंपन्यांनी विकत घेतला आहे व त्यावर कोणते उद्योग विकसित करण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, सदर भूखंडाच्या विक्रीतून मिळणाऱ्या उत्पन्नात एमएमआरडीए व्यतिरिक्त आणखी कोणाचा आर्थिक वाटा असणार आहे व किती प्रमाणात असणार आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७)** :(१), (२), (३) व (४) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वांद्रे-कुर्ला संकुलाच्या "जी" ब्लॉकमधील सी-६५ हा १२,४४६ चौ.मी. क्षेत्रफळाचा व ५०,००० चौ. मी. एवढे कमाल बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय असलेल्या वाणिज्य वापराचा भूखंड विक्रीसाठी वर्तमानपत्रात दिनांक ३०/०३/२०१६ रोजी जाहिरात देऊन निविदा मागविल्या होत्या.

सदर निविदेची राखीव किंमत रु. २,९५,८०० प्रति चौ.मी. म्हणजेच प्राधिकरणाला अंदाजे १४७९ कोटी एवढे किमान उत्पन्न या भूखंडाच्या विक्रीतून अपेक्षित होते. परंतु बृहन्मुंबई क्षेत्रातील कचऱ्याच्या विल्हेवाटीच्या अनुषंगाने अपेक्षित कार्यवाही न झाल्याने मा. मुंबई उच्च न्यायालयाने नवीन विकास परवानगी / आयओडी देवू नये असे ओदश दिनांक २६-२९ फेब्रुवारी, २०१६ रोजी दिलेले आहेत. तसेच वांद्रे-कुर्ला संकुलाच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये वाणिज्य वापराचे भूखंडामध्ये मिश्र वापराचे अनुषंगाने स्पष्ट तरतूद नसल्याने त्याबाबत तरतूद होणेसाठी प्राधिकरणाने विकास नियंत्रण नियमावलीमध्ये फेरबदलाची कार्यवाही महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ खाली सुरू केलेली होती. त्याचा विचार करून प्राधिकरणाने दिनांक ०९/०८/२०१६ रोजी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देवून निविदा मागे घेतलेली आहे.

---

**दहिसर पश्चिमेकडील स्कायवॉकची झालेली दुरवस्था**

**(२६) ७१७८२ (१६-०१-२०१७). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दहिसर पश्चिम (मुंबई) येथील स्कायवॉकवर मोठया प्रमाणावर खड्डे पडले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खड्डयांमुळे अपघात होण्याची शक्यता निर्माण झाली असून नागरीकांना स्कायवॉकवरुन प्रवास करणे धोकादायक झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर स्कायवॉक वरील खड्डयांची तातडीने दुरुस्ती करणेबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१४-०७-२०१७)** :(१) दहिसर पश्चिम येथील संपूर्ण स्कायवॉकवर खड्डे पडले नसून, सदर स्कायवॉकच्या फक्त पश्चिमेकडील जिन्याजवळ खड्डा पडल्याचे ऑक्टोबर २०१६ रोजी निदर्शनास आले.
(२), (३) व (४) नागरिकांच्या सुरक्षेकरिता सदर स्कायवॉकचा पश्चिमेकडील जिना महानगरपालिकेतर्फे बंद करण्यात आला असून महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

---

**एअरपोर्ट रनवे फनेल बाधीत रहिवाशी संघटनेने केलेल्या मागणीबाबत**

**(२७) ७४३१२ (२०-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विश्वजीत भिडे, प्रतिनिधी एअरपोर्ट रनवे फनेल बाधीत रहिवाशी संघटना यांनी दिनांक ४ जानेवारी २०१७ रोजी वा त्या सुमारास मुंबई महानगरपालिकेडे प्रस्ताव सादर करुन उपनगरातील इमारतींना मिळणारा टीडीआर किंवा झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतून निर्माण झालेला टीडीआर अन्यत्र विकण्यास जी सवलत दिली जाते तीच सवलत त्यांना दिल्यास मागील अनेक वर्षापासून प्रलंबित प्रश्न मार्गी लागणार आहे अशा स्वरुपाचे एक निवेदन मुंबई महानगरपालिकेच्या संबंधीत अधिकाऱ्यांना दिल्याची बाब निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई व उपनगरातील खाजगी इमारतींसाठी एक टक्का चटई क्षेत्र अधिक एक टक्का टीडीआर अधिक त्यावर फंजीबल ०.७ अशा प्रकारे २.७ इतके चटई क्षेत्रफळ बांधकामाकरीता मंजुर करण्यात येते, तोच न्याय एअरपोर्ट रनवे फनेल बाधीत रहिवाशांना देऊन मागील अनेक वर्षे प्रलंबित असलेला पुनर्विकासाचा प्रश्न तातडीने सोडवावा अशी मागणी रहिवाशी संघटनेने यापूर्वीही मुंबई प्रशासन व नगरविकास विभागाकडे वारंवार करुनही त्यांच्या मागणीचा विचार न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, मुंबई शहरात व उपनगरात खाजगी इमारतींसाठी व झोपडपट्टी पुनर्वसन योजनांकरीता ज्या प्रकारे नियमात बदल करुन वाढीव एफएसआय देऊन रहिवाशांचे प्रश्न मार्गी लावण्यात येतात तोच न्याय एअरपोर्ट रनवे फनेल बाधीत नागरिकांना उपलब्ध का करुन देण्यात आला नाही,
(४) असल्यास, एअरपोर्ट रनवे फनेल बाधीत रहिवाशी संघटनेने केलेल्या मागणीबद्दल भविष्यात कधीपर्यंत निर्णय घेण्यात येईल,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७)** :(१) फनेल बाधित रहिवाशी संघटनेच्या मागण्यांबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्तरावर यापूर्वीच चर्चा/बैठक झालेली आहे.

(२) ते (५) विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदीस अधीन राहून चटई क्षेत्र वापरण्याची मुभा एअरपोर्ट फनेल क्षेत्रासही लागू आहे. त्याचप्रमाणे शासनाने दिनांक १६ नोव्हेंबर २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावलीतील टिडीआर (हस्तांतरणीय विकास हक्क) च्या तरतूदी पूर्णपणे सुधारित केलेल्या आहे. सदर तरतूदी अवलोकनात घेता एअरपोर्ट रनवे फनेल क्षेत्राबाबत विशेष तरतूदी नाहीत. इतर क्षेत्राप्रमाणे सदर क्षेत्रामध्येही विकास नियंत्रण नियमावलीच्या तरतूदी लागू रहाणार आहेत.

एअरपोर्ट फनेल क्षेत्रामध्ये इमारतीच्या उंचीवर मर्यादा येतात. विमानतळ प्राधिकरणाच्या नाहरकत दाखल्यानुसारच इमारतीच्या उंचीस परवानगी दिली जाते. त्यामध्ये शिथिलता देणेचे अधिकार राज्य शासनास नाहीत. यासंदर्भातील उल्लंघनाबाबत दि एअरक्राफ्ट (डिमॉलिशन व ऑबस्ट्रक्शन कॉज्ड बाय बिल्डींग ॲण्ड ट्रीज) रुल्स १९९४ अंतर्गत कारवाईचे अधिकार केंद्र शासनाच्या सिव्हील एव्हिएशन विभागास आहेत. त्यामुळे फनेल क्षेत्रामध्ये नियमामध्ये बदल करुन वाढीव चटई क्षेत्र देता येणार नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक २७.५.२०१६ रोजी सुधारित प्रारुप विकास आराखडा विकास नियंत्रण नियमावलीसह नागरिकांच्या सूचना/हरकतीसाठी प्रसिध्द केलेला आहे. फनेल क्षेत्रामधील रहिवाश्यांनी सदर क्षेत्रातील विकासाबाबत महानगरपालिकेकडे सूचना/हरकती सादर केलेल्या आहेत. सदर सूचना हकरतींचा/विचार करुन महानगरपालिकेने प्रारुप विकास आराखडा शासनास मंजूरीसाठी सादर केल्यानंतर एकंदर गुणवत्तेनुसार शासनाकडून त्यावर अंतिम मंजूरी संकल्पित आहे.

---

**राज्यातील शहरांची 'स्वच्छ भारत अभियानांतर्गत' निवड करण्याबाबत**

**(२८) ७४५६२ (२०-०४-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात 'स्वच्छ भारत अभियानांतर्गत' केंद्र शासनाकडून किती शहरांची निवड करण्यात आली आहे,

(२) असल्यास, केंद्र शासनाकडून आतापर्यंत किती निधी शासनास प्राप्त झाला आहे व किती शहरांना केंद्राच्या निकषावर आधारित नामांकने मिळाली आहेत,

(३) अद्याप उक्त अभियानांतर्गत निधी प्राप्त झाला नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :**(१) व (२) केंद्र शासनामार्फत करण्यात येणाऱ्या स्वच्छ सर्वेक्षणासाठी केंद्र शासनाने १ लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या देशातील ५०० शहरांची निवड केली होती. यामध्ये राज्यातील ४४ शहरांचा समावेश करण्यात आला होता. स्वच्छ भारत अभियान (नागरी) राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायती क्षेत्रात राबविण्यात येत आहे.

स्वच्छ भारत अभियान (नागरी) अंतर्गत केंद्र शासनाकडून आतापर्यंत राज्य शासनास वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी व नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी सुमारे रुपये ३५७ कोटी एवढा निधी प्राप्त झाला आहे. केंद्र शासनामार्फत करण्यात आलेल्या स्वच्छ सर्वेक्षण, २०१७ नुसार पहिल्या १०० शहरांमध्ये राज्यातील ७ शहरांचा समावेश करण्यात आलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेमार्फत कोटयावधी रूपयांचा निधी खर्च करूनही रस्त्याचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत**

**(२९) ७५२९३ (२१-०४-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिकेमार्फत गत २ वर्षात कोटयावधी रूपयांचा निधी खर्च करूनही निकृष्ट दर्जाच्या कामामुळे रस्त्यांवर जागोजागी खड्डे पडून वाहतूकीची कोंडी होत असून रस्त्यांच्या कामात गैरव्यवहार झाल्याप्रकरणी महापौरांनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचेकडे तक्रार केल्यानंतर सन २०१६ मध्ये निदर्शनास आलेल्या पहिल्या टप्प्याचा अहवाल जाहिर झाला असून तद्‌नंतर ६ कंत्राटदारांविरोधात एफआयआर दाखल झाली असून पालिकेचे रस्ते विभागाच्या व दक्षता विभागाच्या चीफ इंजिनिअरला अटक झाली असून दुसऱ्या टप्प्याचा अहवाल अद्यापी जाहिर करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू दुसऱ्या टप्प्याचा अहवाल जाहिर करण्यास विलंब होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, दुसऱ्या टप्प्याचा अहवाल विनाविलंब जाहिर करून अहवालातील शिफारशीनुषंगाने दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :**(१) पहिल्या टप्प्याच्या अनुषंगाने व प्राथमिक चौकशीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आलेली आहे. दुसऱ्या टप्प्याची चौकशी प्रगतीपथावर आहे.
(२), (३) व (४) दुसऱ्या टप्प्यामध्ये, चौकशी समितीच्या प्राथमिक अहवालानुसार कंत्राटदारांना महानगरपालिकेमार्फत कारणे दाखवा नोटीस निर्गमित करण्यात आलेल्या असून पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

---

**दादर (मुंबई) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी इंदू मिलची ११.४ एकर जागा शासनाने प्रस्तावित केली असल्याबाबत**

**(३०) ७५६२८ (२१-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी इंदू मिलची ११.४ एकर जागा शासनाने प्रस्तावित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ११.४ एकर जागेपैकी ५ एकर जागा सीआरझेड कक्षात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ६.४ एकर जागेव्यतीरिक्त सीआरझेड कक्षात येणाऱ्या उर्वरित जागेवरील सीआरझेडचे आरक्षण उठविण्याबाबत शासनाने केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाकडे परवानगी मिळावी असा प्रस्ताव पाठविला आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावास केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालयाने आरक्षण उठवून सदर जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकास दिली आहे काय वा याबाबतच्या निर्णयात्मक कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) ते (४) इंदू मिलच्या एकंदर ४.८४ हेक्टर क्षेत्रावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडर यांचे स्मारक प्रस्तावित आहे. सदर ४.८४ हेक्टर जागेपैकी सीआरझेड बाहेरील २.८३ हेक्टर क्षेत्रासंदर्भात प्रस्तावित स्मारकाच्या आरक्षणाच्या निर्माणाबाबतची अधिसूचना दिनांक २१.११.२०१६ रोजी निर्गमित केलेली आहे. केंद्र शासनाच्या पर्यावरण व वनमंत्रालयाने प्रस्तावित स्मारकाच्या अनुषंगाने सीआरझेडच्या अधिसूचनेमध्ये दिनांक २३.११.२०१६ रोजी सुधारणा केल्यानंतर सीआरझेडने बाधित होणाऱ्या उर्वरित २.०१ हेक्टर क्षेत्रासंदर्भात दिनांक ५.१.२०१७ रोजी आरक्षणाच्या निर्माणाबाबत अधिसूचना निर्गमित केलेली आहे. या संदर्भातील कार्यवाही पूर्ण झालेली आहे.

---

**मुंबई शहराप्रमाणे उपनगरातील जुन्या चाळी, इमारती व झोपडपट्ट्या यांचा पुनर्विकास करण्याबाबत**

**(३१) ७५८८१ (२०-०४-२०१७). श्री.अजय चौधरी (शिवडी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहराप्रमाणे उपनगरातील जुन्या चाळी, इमारती व झोपडपट्ट्या यांचा पुनर्विकास क्लस्टरमार्फत समुह विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयांतर्गत पुनर्विकासात रहिवाशी भाडेकरुंना किती चौरस फूट चटईक्षेत्र फळाची घरे देण्यात येणार आहेत,
(३) असल्यास, सदर योजनेची अंमलबजावणी सन २००० नंतरच्या झोपडपट्ट्यांनाही लागू करण्यात येणार आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) मुंबई शहरासाठी लागू असलेल्या नागरी नूतनीकरण योजनेच्या (Cluster Development) तरतूदी मा. उच्च न्यायालयाचे अनुमती घेण्याच्या पूर्ततेसापेक्ष मुंबई उपनगर क्षेत्रास लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.
(२) यासंदर्भात मुंबई शहरासाठी लागू असलेल्या मंजूर विनियमाच्या तरतूदीप्रमाणेच रहिवाशी भोगवटदारांना किमान ३०० चौ.फुट क्षेत्राची सदनिका मिळू शकेल.
(३) यासंदर्भात मुंबई शहरासाठी लागू असलेल्या मंजूर विनियमाच्या तरतूदीप्रमाणे नागरी नूतनीकरण योजनेंतर्गत बाधित/समाविष्ट होणा-या १/१/२००० पूर्वीच्या पात्र झोपडपट्टी क्षेत्राचा विकासही अनुज्ञेय आहे.

---

**घोडबंदर (जि.ठाणे) मार्गावरील गायमुख ते कशेळी (भिवंडी) टोलनाक्यापर्यंतच्या बाह्यवळण रस्त्याच्या कामाबाबत**

**(३२) ७६९२८ (२१-०४-२०१७). श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व), श्री.अनिल कदम (निफाड), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घोडबंदर (जि.ठाणे) मार्गावरील वाहनांची कोंडी कमी करण्यासाठी गायमुख ते कशेळी (भिवंडी) टोलनाक्यापर्यंतच्या १५ कि.मी. बाह्यवळण रस्त्याला (बायपास रोड) सागरी क्षेत्र किनारा व्यवस्थापन प्राधिकारणाने परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाह्यवळण रस्त्याचे (बायपास रोड) कामास केव्हा सुरवात होणार असून किती कालावधीत ह्या रस्त्याचे काम पूर्ण करण्यात येणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) होय.
(२) व (३) सदर बाह्यवळण रस्त्यासाठी सर्व आवश्यक परवानग्या (उच्च न्यायालय, वन विभाग, इ.) प्राप्त झाल्यानंतर व ठाणे महानगरपालिकेमार्फत भूसंपादन झाल्यानंतर विषयांकीत कामाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत नियोजित आहे. सदर काम प्रत्यक्षात सुरु झाल्यानंतर पुर्ण होण्यास अंदाजे ३ वर्षांच्या कालावधीत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

---

**कल्याण (जि. ठाणे) रेल्वेस्थानक परीसरात वाहतुकोंडी, फेरीवाल्यांचा उच्छाद, बेकायदा रिक्षा स्थानकांचा विळखा असल्याबाबत**

**(३३) ७६९६५ (२०-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) रेल्वेस्थानक परीसर सततची वाहतुकोंडी, फेरीवाल्यांचा उच्छाद, बेकायदा रिक्षा स्थानकांचा विळखा आणि शासकीय यंत्रणांमध्ये असलेल्या समन्वयाच्या अभावामुळे कल्याण परीसरातील नागरिकांच्या मनात शासनाविरूध्द संतापाची भावना असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाकडून कोणती उपाययोजना करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :**(१) कल्याण रेल्वे स्थानकाजवळ वाहतूक कोंडी होत असल्याची बाब खरी आहे.

कल्याण रेल्वे स्थानक परिसरात रेल्वे स्थानक ते छाया टॉकीज व रेल्वे स्थानक महमद अली चौक, रेल्वे स्थानक ते जरीमरी नालापर्यंत अनधिकृतपणे बसलेल्या फेरीवाल्यांवर महानगरपालिकेच्या फेरीवाला निर्मुलन पथकामार्फत दैनंदिन दंडात्मक कारवाई केली जाते.

तसेच कल्याण रेल्वे स्थानक पश्चिम परिसरातील वाहतूक कोंडी कमी करण्याच्या दृष्टीने तेथील राज्य परिवहन मंडळाचे बस स्थानक स्थलांतरीत करुन, ती जागा वाहतूक व्यवस्थेकरीता तयार करण्यात आलेल्या स्मार्ट सिटी प्रकल्पांतर्गत हाती घ्यावयाच्या कामासाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती महानगरपालिकेने महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे केली आहे.

(२) कल्याण स्टेशन परिसरात दररोज वाहतूक कोंडी सोडविण्याकरीता १ पोलीस अधिकारी व ६ पोलीस कर्मचारी यांची वाहतूक विभागाकडून नेमणूक करण्यात येते.

तसेच, वाहतूक नियमनाकरीता जादा ट्राफिक वॉर्डन नियुक्त करण्यास मान्यता देण्याचा व त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव वाहतूक विभागाकडून महानगरपालिकेस प्राप्त झाला असून त्याबाबतची पुढील कार्यवाही महानगरपालिकेकडून प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन प्रकल्पांच्या सुरुवात होण्याच्या दरात आणि घरांच्या विक्रीत घट झाल्याबाबत**

**(३४) ७७२७४ (२१-०४-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर.तमिल सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत सन २०१६ च्या दुसऱ्या सहामाहीत नवीन प्रकल्पांच्या सुरुवात होण्याच्या दरात ५३ टक्क्यांची घट आणि घरांच्या विक्रीत तब्बल २६ टक्क्यांची घट झाल्याचे सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घट मागील सात वर्षातील नीचांकी घट आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई शहरात गृहनिर्मिती व गृहविक्रीचा दर वाढविण्यासाठी शासनाचे नेमके धोरण काय आहे ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) व (२) यासंदर्भात विभागाकडून सर्वेक्षण करण्यात आलेले नसून ठोस असे निष्कर्ष काढण्यात आलेले नाहीत. तथापि बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिलेला प्रकल्प मंजूरीचा तपशील विचारात घेता प्रकल्प मंजूरीमध्ये घट झालेली दिसून येत आहे. त्याचप्रमाणे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,महाराष्ट्र राज्य यांचा अहवाल विचारात घेता विक्री दस्तांमध्येही घट झालेली दिसून येत आहे, ही वस्तूस्थिती आहे.
(३) प्रकल्प मंजूरीचा दर वाढणेसाठी प्रकल्प मंजूरीची प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे. प्रकल्प मंजूरीची प्रक्रिया ऑन लाईन करण्यात आलेली आहे. याकरिता Ease of Doing Business च्या माध्यमातून बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूरीच्या प्रक्रियेमधील ४२ टप्पे (procedures) कमी करुन त्यांची संख्या ८ पर्यंत आणलेली आहे. त्याचप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून नामंजूरीची प्रकरणे जास्त असल्याचे निदर्शनास येत असल्याने अशी प्रकरणे कमी होण्याच्या दुष्टिकोनातून बृहन्मुंबई महानगरपालिकेस सूचना देण्यात आलेल्या आहेत.

---

## कल्याण-शिळ महामार्गालगतच्या आरक्षित भुखंडावर महानगरपालिका अनधिकृतपणे प्रभाग कार्यालय उभारत असल्याबाबत

**(३५) ७७४८२ (२१-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण - डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण - शिळफाटा रस्त्यावरील रिजन्सी गृहसंकुलाजवळील ज्ञानेश्वर सोसायटीच्या बांधकाम नकाशामध्ये पालिकेने दवाखाना व बालवाडीचे आरक्षण ठेवलेले असतानादेखील सदर ठिकाणी प्रभाग कार्यालय सुरु करणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आल्यानंतर रहिवाशांनी मा. मुख्यमंत्र्यांकडे व नगरविकास सचिवांकडे तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी ज्येष्ठ नागरिक संघाचे कार्यालय सुरु असून रहिवाशांनी सदर ठिकाणी प्रभाग कार्यालयाऐवजी बालवाडी व रुग्णालयाचे आरक्षण कायम ठेवण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत महानगरपालिकेने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७)** :(१) व (२) अंशतः खरे आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण-शिळफाटा रस्त्यावरील रिजन्सी गृहसंकुलाजवळील ज्ञानेश्वर सोसायटीच्या बांधकामास परवानगी प्रदान करतेवेळी भूखंडाचे क्षेत्र २ हेक्टरपेक्षा जास्त असल्याने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र.६४ नुसार सदरहू भुखंडावर बांधकाम/रेखांकन मंजूर केले व त्यामधील ३८९४.१३ चौ.मी. क्षेत्र सोयीसुविधा क्षेत्र (ॲमेनिटी स्पेस) म्हणून राखीव ठेवण्यात आले होते.

परंतु, सदर भुखंडावर दवाखाना व बालवाडी हे आरक्षण महानगरपालिकेच्या विकास योजनेमध्ये प्रस्तावित नाही. तथापि, सोयीसुविधा क्षेत्र म्हणून आरक्षित असलेल्या क्षेत्रावर दवाखाना व बालवाडी हा वापर रेखांकन मंजूरी नकाशावर दर्शविण्यात आला होता.

सबब कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावांकरीता महानगरपालिकेचे प्रभाग क्षेत्र कार्यालयासाठी मोकळा भुखंड उपलब्ध झाला नाही. त्यामुळे २७ गावांकरीता प्रभाग क्षेत्र कार्यालयाची निकड लक्षात घेता, उक्त जागेचा महानगरपालिकेने ताबा घेवून मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम २४(१) मधील तरतूदीनुसार महानगरपालिका आयुक्त यांना असलेल्या अधिकारांतर्गत सार्वजनिक व व्यापक जनहिताकरीता सदर जागेचा वापर करण्याच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात प्रभाग क्षेत्र कार्यालय सुरु करण्यात आले आहे.

सदर ठिकाणी सुरु असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यालयास महानगरपालिकेने कोणतीही परवानगी प्रदान केलेली नाही.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कल्याण (जि.ठाणे) सिध्दार्थनगर मधील प्रकल्पबांधीताचे पुर्नवसन करण्याबाबत

**(३६) ७७४८३ (२१-०४-२०१७). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) सिध्दार्थनगर मधील प्रकल्पबांधीताचे तातडीने योग्य पुर्नवसनासाठी महानगरपालिका आणि रेल्वे प्रशासनाकडे प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे परीसरातील नागरिकांकडून मागणी होत असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१७ वा त्या दरम्यान निर्देशनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी वर्षानुवर्ष घरांपासून वंचित असणाऱ्या नागरिकांना तात्काळ न्याय देण्यासाठी शासनस्तरावर कोणत्या उपाययोजना सुरू आहेत व करण्यात येणार आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील कल्याण (पूर्व) राजश्री शाहू उद्यान ते रमाबाई आंबेडकर चौक (सिद्वार्थनगर) येथील रस्ता रुंदीकरणात एकूण २५ बाधित बांधकामधारकांचे प्रस्ताव महानगरपालिकेस प्राप्त झाले आहेत.

सदर प्रस्तावांनुसार महानगरपालिकेच्या दि.११/०८/२०१४ रोजी झालेल्या पुनर्वसन समितीच्या बैठकीमध्ये उक्त २५ बाधित बांधकामधारकांपैकी ५० टक्के पेक्षा अधिक बांधकाम बाधित झाले आहे, अशा १५ बाधितांना महानगरपालिकेने पात्र ठरविले आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

तर उर्वरित १० बाधितांचे बांधकाम ५० टक्के पेक्षा कमी बाधित होत असल्यामुळे महानगरपालिकेने त्यांना पुनर्वसनासाठी अपात्र ठरविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंधेरी पूर्व (मुंबई) नागदास रोड येथील इंदिरा नगरमध्ये रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणाऱ्या घरांवर महानगरपालिकेने नोटीस न देताच कारवाई केल्याबाबत**

**(३७) ७७५६१ (२१-०४-२०१७). ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंधेरी पूर्व (मुंबई) नागदास रोड येथील इंदिरा नगरमध्ये रस्ता रुंदीकरणात अडथळा ठरणाऱ्या घरांवर महानगरपालिकेने नोटीस न देताच कारवाई केली असल्याने येथील कुटुंब रस्त्यावार आल्याचे माहे जानेवारी,२०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या के.पूर्व विभागाने येथील ३० ते ४० घरे जमीनदोस्त केल्याने ऐन थंडीत उघड्यावर संसार थाटण्याची नामुष्की येथील रहिवाशांवर आली असून मुलाबाळांना घेऊन बायकांना रस्त्यावर झोपावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी नोटीस न देताच कारवाई करणाऱ्या महानगरपालिका चौकशी करण्यात आली आहे काय,त्यानुसार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) असल्यास, सदरहू कुटुंबांचे पुनर्वसन करून त्यांना निवारा देण्याबाबत शासन काय कार्यवाही करणार वा करित आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के / पूर्व विभाग कार्यालयातील प्रभाग क्रमांक ७१ मध्ये निकालसवाडी इंदिरानगर येथे नाला व रस्तारुंदीकरणाचे काम चालू असून सदर कामात बाधीत झोपडीधारकांना महानगरपालिकेमार्फत नोटीस देवून झोपडीधारकांची प्रात्रता दिनांक ०१.०१.१९९५ व दिनांक ०१.०१.२००० प्रमाणे महानगरपालिकेमार्फत निश्चित करुन साक्षांकीत परिशिष्ट-२ तयार करण्यात आले आहे.

(२), (३) व (४) पात्र झोपडीधारकांना महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करुन दिलेल्या ठिकाणी स्थलांतरीत करण्यासाठी प्रस्ताव पत्र व तद्‌नंतर वाटप पत्र वितरीत करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**उरण (जि.रायगड) कर्जत ते चौक येथील रस्त्याचे सिमेंटकाँक्रिटकरणाचे काम निकृष्ट झाल्याबाबत**

**(३८) ७७९५३ (२१-०४-२०१७). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) कर्जत ते चौक येथील रस्त्याचे एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून सिमेंटकाँक्रिटीकरण करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्त्याचे सिमेंटकाँक्रिटकरणाचे काम निकृष्ट झाल्याने अवघ्या वर्षभरातच या रस्त्यावर खड्डे पडून त्याची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबतच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी व जनतेनी एम.एम.आर.डी.ए, मुंबई कार्यालयाकडे तसेच शासनाकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तक्रारी करुनही अद्याप कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत तसेच शासनाने सदर रस्ता त्वरीत दुरुस्त करण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) हे अशंत: खरे आहे.

(२), (३), (४) व (५) विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत सन २०१४ मध्ये कर्जत ते चौक (राज्य महामार्ग ३५) या रस्त्याच्या एकूण ६.७ कि.मी. लांबीपैकी १.१ कि.मी. रस्त्याचे सिमेन्ट कॉक्रिटीकरण मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात आले आहे. सदर रस्त्याचे काम माहे मे, २०१५ मध्ये पूर्ण झाले असून सदर रस्ता वाहतुकीस सुस्थितीत आहे.

---

**नागपूर शहरात साथीच्या आजाराची गंभीर परीस्थिती लक्षात घेता महानगरपालिकेला वाढीव निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३९) ७८२३६ (२१-०४-२०१७). श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर महानगरपालिकेद्वारे स्वाईन फ्लु, डायरीया, कावीळ, मलेरीया व डेंग्यु इत्यांदी रोगांवर नियंत्रण व उपाययोजना करण्याकरीता वर्षाला फक्त २५ लक्ष रूपयाच्या निधीची तरतुद करण्यात येत असल्याबाबत बाब माहे डिसेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या साथीच्या रोगांच्या नियंत्रणाकरीता महानगरपालिकेद्वारा सन २०१३-१४ या वर्षापासुन प्रतीवर्षी २५ लक्ष रूपयांच्या निधीची तरतुद करण्यात आली होती परंतु शहराची दिवसेंदिवस वाढत असलेली लोकसंख्या लक्षात घेता हा निधी सुध्दा अपुरा पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, हा निधी अपुरा पडत असल्यामुळे सन २०१३ ते सन २०१६ या कालावधीत अनेक रूग्ण साथीच्या आजारामुळे मृत्युमुखी पडले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, नागपूर शहरात सुरू असलेल्या साथीच्या आजाराची गंभीर परीस्थिती लक्षात घेता त्याच्या नियंत्रण व उपाययोजनाकरीता शासनाकडुन नागपूर महानगरपालिकेला वाढीव निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०७-२०१७) :**(१) आर्थिक वर्ष सन २०१६-२०१७ मध्ये मलेरिया व डेंग्यू रोगावर नियंत्रण करण्याकरिता रु.२५.०० लक्ष व हैजा व इतर संक्रमक रोगावरील नियंत्रणासाठी रु.५.०० लक्ष इतकी तरतूद करण्यात आलेली आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) सन २०१३ ते सन २०१६ या कालावधीतील वस्तुस्थिती खालीलप्रमाणे आहे :-

| सन | मृत्यू झालेल्या रुग्णांची संख्या | |
|---|---|---|
| | डेंग्यु | स्वाईन फ्लु |
| २०१३ | ०१ | ०३ |
| २०१४ | ०४ | १० |
| २०१५ | ०२ | ५५ |
| २०१६ | ०१ | १३ |
| एकूण :- | ०८ | ८१ |

(४) व (५) नागपूर महानगरपालिकेस हिवताप व हत्तीरोग विभागातील कर्मचा-यांच्या वेतनासाठी सहसंचालक, आरोग्य सेवा (हि.ह. व ज.रो.), पुणे या कार्यालयामार्फत सहायक अनुदान दिले जाते. परंतु साथीच्या आजारांचे नियंत्रणाकरिता नागपूर महानगरपालिकेकडून सहसंचालक, आरोग्य सेवा (हि.ह.व ज.रो.), पुणे कार्यालयास प्रस्ताव सादर झालेला नाही.

तथापि, डेंग्यु मलेरिया सारख्या रोगाच्या नियंत्रणाकरिता महानगरपालिका स्वत:च्या फंडातून खर्च करीत असल्याचे, आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्या अहवालात नमूद करण्यात आले आहे.

---

### मुंबई आरे कॉलेनीत मेट्रो कारशेडसह तीन एफएसआयचा टॉवर उभारणार असल्याबाबत

**(४०) ७९१७४ (२१-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई आरे कॉलनीत मेट्रो कारशेडसह तीन एफएसआयचा टॉवर उभारणार असल्याचे माहे जानेवारी, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरे कॉलनीत व्यावसायिक बांधकाम करून हजारो कोटी रुपये उभारण्याचे धोरण एमआरसीसी (महामंडळाचे) आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) ते (४) कुलाबा-बांद्रा-सीप्झ या मेट्रो रेल्वे-३ मार्गाच्या कार शेडसाठी आरे कॉलनी येथे ३३ हेक्टर जागा आरक्षित करणेचा निर्णय घेतलेला आहे. त्यासंदर्भात मंजूर विकास योजनेमध्ये फेरबदलाची सूचना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१अेअे) अन्वये नागरिकांच्या सूचना/हरकतीसाठी दिनांक २९.१२.२०१६ रोजी प्रसिध्द करणेत आलेली आहे. याबाबत वैधानिक कार्यवाही सुरु आहे.

एकंदर आरक्षित करावयाच्या ३३ हेक्टर जागेपैकी ३ हेक्टर जागा ही प्रकल्पासाठी येणा-या खर्चाची प्रतीपूर्ती व्हावी म्हणून मुंबई मेट्रो रेल्वे कार्पोरेशनकडून व्यावसायिक कारणासाठी वापरणेचे प्रस्तावित आहे. तथापि त्याकरिता ३.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहिल अशा प्रकारचा कोणताही निर्णय शासनाकडून घेणेत आलेला नाही

---

## म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासाठी शासनाने सुधारित विकास नियमावली जाहिर केल्याबाबत

**(४१) ७९६७७ (२०-०४-२०१७). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हाडा वसाहतीच्या पुनर्विकासासाठी शासनाने सुधारित विकास नियमावली माहे जानेवारी, २०१७ मध्ये जाहिर केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विकासकाला २ हजार चौरस मीटरपर्यंतच्या भूखंडावरील वसाहतींचा पुनर्विकास करतांना म्हाडाला प्रीमियम देण्याची परवानगी सदर नियमावलीत दिली असल्याने सर्वसामान्यांसाठी घरे मिळणार नसल्याने या धोरणाचा पुन्हा विचार करावा अशी मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सुधारित विकास नियमावलीला गृहनिर्माण विभागाच्या तीन पैकी दोन अधिकाऱ्यांनी विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, विरोध करण्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने यासंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश महेता (०५-०७-२०१७) :** (१) होय.

नगरविकास विभागाने दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ (१) (अेअे) अन्वये विनियम ३३ (५) मध्ये सुधारणा करण्याबाबत प्रारुप सूचना प्रसिध्द करुन त्याव्दारे हरकती व सूचना मागविण्यांत आलेल्या आहेत

(२) सदर फेर बदलाच्या सुचनेवर मागविण्यात आलेल्या हरकती व सुचनांबाबत उपसंचालक, नगर रचना विभाग यांचेकडे सुनावणी घेण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालाड पश्चिम (मुंबई) रेल्वे स्टेशन बाहेरील ईश्वरलाल पारेख रस्ता साईनाथ क्रॉस रोड व आनंद रस्ता येथे दुकानदारांनी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे केल्याबाबत

**(४२) ७९९२० (२१-०४-२०१७). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड पश्चिम (मुंबई) रेल्वे स्टेशन बाहेरील ईश्वरलाल पारेख रस्ता, साईनाथ क्रॉस रोड व आनंद रस्ता येथे दुकानदारांनी मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे करून रस्ता अडविला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामे पाडण्यासाठी अनेक वेळा नोटीस देण्यात येवूनही महानगरपालिका अधिका-यांनी बांधकाम पाडलेले नाहीत, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकामामुळे या परिसरात नागरिकांना मोठा त्रास होत असून अपघातांचे प्रमाण वाढले असतानाही कारवाई न करण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, सदर अनधिकृत बांधकामे तातडीने हटविण्यात यावी अशी मागणी सदर लोकप्रतिनिधींनी दिनांक २९ जून, २०१६ वा त्या सुमारास मा. राज्यमंत्री, नगरविकास यांचेकडे केली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१), (२) व (३) हे खरे नाही.

(४) हे खरे आहे.

(५) सदर रस्त्यांची संपूर्ण स्थळदर्शक नकाशा तसेच सीमांकन निश्चितीनंतर खातरजमा करण्यात येणार आहे.

तथापि, मंजुर विकास आराखडयानुसार ईश्वरलाल पारेख रस्ता १८.३० मी., साईनाथ क्रॉस रोड १८.३० मी. आणि आनंद रोड १३.४० मी. रुंदीचे आहेत.

सदर रस्त्यांच्या बाजूला असलेल्या ९० फुटी एस.व्ही. रोड रुंदीकरणाचे काम हाती घेण्यात आले असून, सदर काम झाल्यानंतर ईश्वरलाल पारेख रस्ता, साईनाथ क्रॉस रोड व आनंद रस्ता या रस्त्यांचे काम महानगरपालिकेमार्फत तातडीने हाती घेण्यात येणार आहे.

---

**मुंबईतील मनोरंजन मैदान आणि खेळाची मैदाने खाजगी संस्थांना देण्यात आल्याबाबत**

**(४३) *८०९७१* (२१-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील मुख्यमंत्र्याच्या आदेशानंतर ताब्यात घेतलेली उद्याने व मनोरंजन मैदाने मर्जीतील जुन्याच संस्थाना दत्तक देण्याच्या धोरणाला महानगरपालिकेच्या सुधार समितीने मान्यता दिली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, शासनाच्या या धोरणामुळे सदर मैदाने व उद्याने ज्या संस्थाना देण्यात येणार आहेत त्या संस्थाची तिथे मक्तेदारी निर्माण होवून सामान्य नागरिकांना तेथे मज्जाव होण्याची शक्यता आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, यामुळे शासनाने या धोरणाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२१-०६-२०१७) :** (१), (२), (३) व (४) मा. मुख्यमंत्री महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेने दत्तक तत्वावर दिलेल्या २१६ भूखंडांपैकी १५८ भूखंड महानगरपालिकेने ताब्यात घेतले असून, उर्वरित ५८ भूखंड परत घेण्याची प्रक्रिया सुरु आहे.

महानगरपालिकेने ताब्यात घेतलेली उद्याने व मनोरंजन मैदाने कोणत्याही संस्थेस देण्यात आलेली नसून, त्यांचे परिरक्षण सद्य:स्थितीत महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

तथापि, उद्याने व मनोरंजन मैदाने यांच्या परिरक्षणासाठीचे तात्पुरते धोरण प्रस्तावित असून, त्यास महानगरपालिकेच्या सुधार समितीने डिसेंबर, २०१६ मध्ये मान्यता दिली आहे. परंतु या तात्पुरत्या धोरणास महानगरपालिकेची अद्यापि मान्यता मिळालेली नाही.

<u>प्रस्तावित तात्पुरते परिरक्षण धोरण:-</u>

- सदर कालावधी दत्तक तत्त्वावर मानण्यात येणार नाही.
- सदर व्यवस्था ११ महिने किंवा दत्तक धोरणाला मान्यता मिळेपर्यंत जे अगोदर असेल तेवढ्या कालावधीसाठी राहील.
- त्याअंतर्गत भूखंड ११ महिन्यांसाठी केवळ परिरक्षणाकरीता संस्थांच्या ताब्यात देण्यात येतील.

• परिरक्षणासाठी देण्यात येणाऱ्या भूभागांवर सर्वसामान्य नागरीकांना प्रवेश व सर्व सोयी सुविधा नि:शुल्क देणे बंधनकारक असेल.

उद्याने व मनोरंजन मैदाने दत्तक तत्त्वावर देण्याचे धोरण महानगरपालिकेमार्फत सर्वंकष विचार करुन पुनर्विलोकित करण्यात येत आहे.

---

**मुंबई महानगरपालिकेने आपले अधिकारी कर्मचा-यांना अल्पदरात भाडेपटटयाने दिलेल्या भुखंडावरील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुर्नविकासाबाबत**

**(४४) ८०९७९ (२०-०४-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेने आपले अधिकारी कर्मचा-यांना अल्पदरात भाडेपटटयाने दिलेल्या भुखंडावरील मोडकळीस आलेल्या इमारतींच्या पुर्नविकास योजनेला चालना देण्यासाठी प्रशासनाने नवीन धोरण आखले असून या धोरणाला सुधार समितीने मंजूरी दिली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय

(२) असल्यास, या धोरणाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर धोरणाचे स्वरुप पुढीलप्रमाणे आहे:-

• महापालिकेच्या सेवेत सलग ३ वर्षे सेवा कालावधी पूर्ण करणारे मानीव कायमत्व प्राप्त झालेले मनपा कर्मचारी तसेच सेवानिवृत्त महानगरपालिका कर्मचाऱ्यांना सदस्यत्व देण्यात येईल.

• सदर कर्मचाऱ्याच्या नावे मुंबई शहरात मालकी हक्काचे निवासस्थान नसावे.

• विकास हक्क हस्तांतरणानुसार उपलब्ध होणाऱ्या सदनिकांचे सभासदत्व देण्यात येणारे १००% सभासद हे महापालिका कर्मचारी असणे आवश्यक असल्याने प्रतिक्षायादी तयार करण्यात येणार नाही.

• सद्य:स्थितीत आकारल्या जाणाऱ्या रकमेचे मूल्य फारच कमी असल्यामुळे यापुढे नवीन सदस्यांना प्रति सदस्य रु. २५,०००/- इसारा रक्कम म्हणून आकारण्यात येतील.

• वाढीव चटईक्षेत्र व हस्तांतरणीय विकास हक्कमधून उपलब्ध होणाऱ्या सदनिकांचा लाभ घेण्याकरिता सध्या अस्तित्वात आलेले सभासद पुढे आल्यास त्यांना टी.डी.आर. चा लाभ मिळेल.

• नवीन नामनिर्देशित सभासदांस वरील धोरणाचा फायदा न मिळता त्यांना प्रचलित धोरणाचा फायदा मिळेल.

• एक रकमी अधिमुल्य घरगुती वापरासाठी ५% दराने व व्यावसायिक वापरासाठी १०% दराने आकारण्यात येईल.

• वाढीव चटईक्षेत्र निर्देशांक / हस्तांतरणीय विकास हक्क उपलब्ध होणाऱ्या सदनिकांचा लाभ घेतलेल्या सदनिकाधारकांस भुईभाडयाची आकारणी प्रचलित धोरणाप्रमाणे जुन्याच दराने म्हणजेच सदनिकेचे वाटप करण्यास मंजुरी देण्यात आलेल्या दिनांकास प्रचलित असलेल्या सिध्दगणक दराच्या २५% च्या १५% दराने भुईभाडे आकारण्यात येईल.

• महापालिका कर्मचाऱ्यांना सदनिका हस्तांतरणाकरिता संस्थेस ताबा प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर १५ वर्षे कालावधी अथवा सेवानिवृत्ती ही अट कायम राहील.

(३) व (४) महानगरपालिका प्रशासनाने सुधारीत धोरण सुधार समिती व बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मान्यतेसाठी सादर केले असून, या सुधारीत धोरणास सुधार समितीची मान्यता प्राप्त झाली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मान्यतेसाठी सादर केलेला प्रस्ताव दिनांक ०४.०५.२०१७ रोजी भरलेल्या महापालिकेच्या सभेत विचारात घेऊन सदर प्रस्ताव तहकुब करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**मुबईतील नरिमन पॉईट ते कांदीवलीपर्यंत कोस्टल रोड तयार करण्याबाबत**

**(४५) ८१३९१ (२०-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील नरीमन पॉइंट ते बोरीवली या प्रस्तावित कोस्टल रोडला अखिल महाराष्ट्र मच्छीमार कृती समिती व इतर काही संस्था, व्यक्तींनी शासनाकडे हरकत नोंदवून विरोध दर्शविला आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू हरकतींची शासनाकडून चौकशी करण्यात आली वा येत आहे,

(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून आले व शासनाने याबाबत तोडगा काढण्याबाबत आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :** (१) ते ४) मुंबईच्या दररोजच्या वाहतूक कोंडीवरील उपाय म्हणून कोस्टल रोडचा नरीमन पॉईंट ते बोरीवली या किनारी महामार्गाचा पर्याय पुढे आलेला आहे. सदर प्रकल्प बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून राबविणेत येत आहे.

सदर प्रकल्पाचा विस्तृत प्रारुप अहवाल हा बृहन्मुंबई महानगरपालिकेने, महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जनतेच्या सुचना/हरकतीसाठी दिनांक २५ जून २०१५ रोजी उपलब्ध केलेला होता. त्यावर अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समिती व इतर काही संस्था, व्यक्तीनी विरोध दर्शविलेला आहे. सदर रस्त्याच्या प्रारुप अहवालामध्ये पर्यावरणीय

दृष्टिकोनातून मूल्यमापन करण्यात आलेले आहे. पूर्ण प्रारुप प्रकल्प अहवालाचे पुनर्विलोकनासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सल्लागाराची नेमणूक केलेली आहे. या प्रकरणी प्राप्त झालेल्या तक्रारींचे अवलोकन करुन नागरिकांच्या सूचना/ हरकती विचारात घेवून प्रकल्पाचे पुढील तपशीलवार अंदाजपत्रक आराखडे तयार करुन किनारी महामार्गाची अंमलबजावणी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून संकल्पित आहे.

---

**कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मुंबई महानगरातील भुयारी मार्गाच्या मेट्रो रेल्वेच्या कामाबाबत**

**(४६) ८१६४७ (२०-०४-२०१७). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुलाबा-वांद्रे-सिप्झ या मुंबई महानगरातील भुयारी मार्गाच्या मेट्रो रेल्वेचे ३३.५ कि.मी. मार्गाचे माहे ऑक्टोबर, २०१६ पासून सुरु झालेल्या भौगोलिक सर्वेक्षण व भूगर्भ तपासणीचे काम पूर्ण करून या मार्गातील अस्तित्वातील इमारतींची सद्यस्थिती व भूसंपादनाची कार्यवाहीचे काम पूर्ण करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भुयारी रेल्वेमार्गाच्या कामास किती खर्च अपेक्षित आहे व कामाची सध्यस्थिती काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०७-२०१७) :**(१)सदयस्थितीत मेट्रो स्थानकाचे बांधकाम सुरू असून त्याचबरोबर विविध प्रकारच्या भुगर्भ चाचण्या तसेच इमारतींच्या सदयस्थितीचे सर्वेक्षणाचे काम प्रगातीपथावर आहे.मेट्रो मार्गाच्याजवळील इमारतीचे सदयस्थिती सर्वेक्षणाचे तसेच देखरेखीचे/निगरानीचे काम हे प्रकल्प राबवताना विविध टप्प्यामध्ये प्रकल्प संपेपर्यंत व त्यानंतरसुध्दा करण्यात येणार आहे.

(२) व (३) मेट्रो लाईन-३प्रकल्पासाठी एकूण रू.२३१३६/-कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर प्रकल्पातील मेट्रो स्थानकाची कामे प्रगाती पथावर आहेत.

---

**औरंगाबाद शहरातील मिटमिटा परिसरातील गट क्र. ८९, ९०, ९१, मधील मालमत्तेसाठी टि.डी.आर.ची मागणी करण्यात आली असल्याबाबत**

**(४७) ८२३६५ (२१-०४-२०१७). श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहरातील मिटमिटा परिसरातील गट क्र. ८९,९० व ९१ मधील सुमारे सव्वा पाच एकर क्षेत्रुळ मालमत्तेसाठी टि.डी.आर. ची मागणी करण्यात आली होती त्या मालत्तेचे प्रकरण न्यायप्रविष्ट असतांना टि.डी.आर. देण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टि.डी.आर. मिळवण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रामध्ये चालू वर्षाचा नकाशा होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मालमत्तेचे बनावट दस्तऐवज बनवून टि.डी.आर. घेतला आहे, हे ही खरे आहे काय ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०६-०७-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे. मिटमिटा येथील गट क्र. ८९, ९० व ९१ अंतर्गत २४.०० मी. रुंद विकास योजना रस्त्याने बाधीत २.५२ हेक्टर क्षेत्रासाठी २०११ मध्ये टि.डी.आर प्रस्ताव दाखल झाला होता. या प्रकरणात न्यायालयीन प्रकरण सुरु असल्याचे त्याच वेळी निदर्शनास आले होते.

प्रस्तावाची तांत्रिक छाननी झाल्यानंतर मालकी हक्काबद्दल खात्री करण्यासाठी महानगरपालिकेच्या विधी विभागाकडे प्रकरण वर्ग केले असता, त्यांनी न्यायालयात वाद असल्याचा मात्र त्यात तडजोड झाल्याचा उल्लेख केला. त्यानुषंगाने संबंधिताकडून संपूर्ण कागदपत्रे मागवून ती सर्व विधी विभागामार्फत महापालिकेचे उच्च न्यायालयातील पॅनल वरील विधीज्ञांकडे तपासाणीसाठी पाठविण्यात आले असता, त्यांनी त्यांचा सखोल अभ्यास करून टि.डी.आर स्वरुपात मोबदला देणेबाबत अनुकूल अहवाल दिला. तसेच हे क्षेत्र निर्विवाद असल्याचे प्रमाणपत्रही दिले. त्यानंतर आवश्यक कार्यवाही करून बाधित क्षेत्र महापालिकेच्या नावे करून घेण्यात आले. तसेच जागेचा ताबा पावती करून रितसर ताबा घेण्यात आला.

(२) प्रस्ताव सोबत त्या वर्षाचा नकाशा व सातबारा उतारा दाखल करण्यात आला होता.

(३) हे खरे नाही.

---

**मुंबई महानगरपालिकेच्या शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना सेवा पुरविणाऱ्या महिला बचत गटांना निधी प्राप्त झालेला नसल्याबाबत**

**(४८) ८२३९८ (२०-०४-२०१७). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगरपालिकेच्या शालेय पोषण आहार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना सेवा पुरविणाऱ्या महिला बचत गटांना शैक्षणिक वर्ष सन २०१६-२०१७ चा निधी प्राप्त झालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेच्या अनागोंदी कारभारामुळे गत १० महिन्यांचे महिला कामगारांचे पगार थकले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने तात्काळ वेतन मिळणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) व (२) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत सन २०१६-१७ या वर्षासाठी केंद्र शासन व राज्य शासनाकडून मंजूर केलेले अनुदान शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांच्याकडून अद्यापि प्राप्त झाले नव्हते.

तथापि, एप्रिल ते जुलै, २०१६ या कालावधीसाठी मंजुर झालेल्या अनुदानाचे धनादेश दिनांक ०८.०५.२०१७ रोजी शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग यांच्याकडून प्राप्त झाले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील शाळांतील विद्यार्थ्यांना आहार पुरविणाऱ्या महिला संस्था / महिला बचत गट / स्वयंसेवी संस्थांच्या सन २०१६-१७ च्या माहे एप्रिल ते जुलै, २०१६ पर्यंतच्या देयकांचे अधिदान सन २०१५-१६ च्या शिल्लक रकमेतून करण्यात आले आहे.

तसेच, माहे ऑगस्ट २०१६ ते फेब्रुवारी २०१७ या कालावधीतील देयकांचे अधिदान शासनाने नव्याने विकसित केलेल्या एम.डी.एम. (MDM) पोर्टलवरील माहितीनुसार मार्च २०१७ पर्यंत करण्यात आले आहे.

तद्नंतर प्राप्त झालेल्या देयकांचे अधिदान करण्याची कार्यवाही प्राथमिक पडताळणी व लेखा पडताळणी झाल्यावर तात्काळ करण्यात येणार आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नायगाव (ता.वसई, जि. पालघर) पूर्व-पश्चिम भागाला जोडणा-या उड्डाणपूलाचे बांधकाम करण्याबाबत

**(४९) ८४६६४ (२१-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नायगाव (ता.वसई, जि. पालघर) पूर्व-पश्चिम भागाला जोडणा-या उड्डाणपूलाचा गर्डर कोसळल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पुलाच्या दुस-या एका गर्डरला तडे गेल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार उक्त ठिकाणी नवीन उड्डाणपुल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१३-०७-२०१७) :**(१) व (२) होय.

(३) व (४) माहे जानेवारी, २०१७ मध्ये एक गर्डर जागेवर ठेवतांना जॅक फेल्युअर होऊन अपघाताने खाली पडल्याचे निदर्शनास आले असून त्यानुषंगाने भविष्यात योग्य ती काळजी घेण्याविषयी कामाच्या कंत्राटदारास मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत लेखी सूचीत केले आहे.

माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये एका गर्डरला ताण दिल्यानंतर निरीक्षणामध्ये अति ताणामुळे गर्डरला तडे गेल्याचे निदर्शनास आले असून सदर गर्डर त्वरीत रद्द करण्यात आला आहे. उक्त दोन्ही गर्डर सल्लागारामार्फत रद्द करण्यात आले असून सदर दोन्ही गर्डर कंत्राटदाराच्या खर्चाने परत नव्यने करुन घेण्यात येत आहेत.

---

**मुंबई शहरात रस्त्याच्या दुतर्फा २०० मिटरच्या अंतराने स्ट्रीट फायर हायड्रेण्ड बसविण्याबाबत**

**(५०) ८४७६७ (२१-०४-२०१७). अॅड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरात घन लोकसंख्या (दाटीवाटीने घरे / झोपडपट्टी) असलेल्या भागांतील रस्त्याच्या दुतर्फा २०० मिटरच्या अंतराने स्ट्रीट फायर हायड्रेण्ड बसविण्याबाबत विभागातील विविध सामाजिक / नागरी संघटनांचे पदाधिकारी, जागरूक नागरीक, लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री, राज्यमंत्री(नगरविकास) यांचेकडे माहे डिसेंबर, २०१६ वा त्यादरम्यान लेखी निवेदनाव्दारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोणत्याही नैसर्गिक वा मानवनिर्मित आणीबाणीच्या काळात आगी सारख्या दुर्घटनेवर नियंत्रण आणण्याकामी स्ट्रीट फायर हायड्रेण्ड नसल्याकारणाने अडचण निर्माण होत असल्याचे निष्पन्न होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,उक्त प्रकरणी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१२-०७-२०१७) :** (१) हे खरे आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

(३) मुंबई अग्निशमन दलातर्फे प्रत्येक अग्निशमन केंद्राच्या हद्दीतील स्ट्रीट फायर डायड्रेण्डची दर ३ महिन्यांनी तपासणी केली जाते व नादुरुस्ती फाय हायड्रेण्डची यादी पत्यासह सविस्तर अहवाल संबंधित विभागाकडे दुरुस्तीच्या पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात येतो.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.